सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ३० जुलै २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ११८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर ईडी कारवाई
### बदलीनंतर दुसऱ्याच दिवशी १२ ठिकाणी छापे



विरार: वसई-विरार महापालिकेचे माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यावर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मंगळवारी कारवाई केली. वसई-विरार परिसरातील अनधिकृत बांधकामप्रकरणी दाखल गुन्ह्यानंतर ईडीने पहाटेपासून पवार यांच्या निवासस्थानासह १२ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. ही छापेमारी मुंबई, नाशिक आणि वसई-विरार या तीन ठिकाणी करण्यात आली. विशेष म्हणजे, बहुसंख्य ठिकाणे पवार यांच्याशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे.

छाप्यांची मोहीम अत्यंत गोपनीयपणे राबवण्यात आली असून ती संपूर्ण दिवसभर सुरू होती. माजी नगरसेवक धनंजय गावडे यांनी या संदर्भात तक्रारी दाखल केल्या होत्या, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे, सोमवारी अनिलकुमार पवार यांचा वसई-विरार महापालिकेमधून निरोप समारंभ पार पडला होता. आणि दुसऱ्याच दिवशी म्हणजे मंगळवारी सकाळीच ईडीने त्यांच्या घरी आणि इतर ठिकाणी छापे टाकल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

सध्या पवार यांची बदली ठाण्यातील एसआरए (स्लम रिहॅबिलिटेशन अथॉरिटी) विभागात करण्यात आली आहे.

## डोक्यावर केस नाही म्हणून चीनला देणार का?: अमित शाहांचा नेहरुंसह काँग्रेसवर'हल्लाबोल'
### काँग्रेसने इतिहासात केलेल्या चुकांमुळेच आज दहशतवादाची समस्या उग्र झाली

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत 'ऑपरेशन सिंदूर'वरील चर्चे दरम्यान काँग्रेसवर कडाडून हल्लाबोल केला. त्यांनी ठामपणे सांगितले की, काँग्रेसने इतिहासात घेतलेल्या चुकीच्या निर्णयांमुळेच आज देशाला दहशतवादासारख्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे.

शाह यांनी १९६२च्या भारत-चीन युद्धाचा संदर्भ देत तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, नेहरूंनी अक्साई चीनचा ३८,००० चौरस किलोमीटर भूभाग चीनला दिला होता. नेहरू म्हणाले होते की, त्या भागात गवताची काडीही उगवत नाही, तर त्याचं काय करणार? त्यावर खासदार महावीर प्रसाद त्यागी यांनी प्रत्युत्तर दिलं होतं, 'तुमच्या डोक्यावरही केस नाहीत, मग तेही चीनला द्यायचे का?'

इतिहासातील इतर अनेक घटनांवर भाष्य करत शाह म्हणाले की, १९४८ मध्ये भारतीय



लष्कर काश्मीरमध्ये आघाडीवर असतानाही नेहरूंनी एकतर्फी युद्धविराम घोषित केला होता. सरदार पटेल युद्ध थांबवू नका म्हणत होते, पण नेहरूंचा निर्णय वेगळा होता.

१९६० मधील सिंधू पाणी वाटप करारावर भाष्य करताना शाह म्हणाले, भारतीय हिताच्या विरुद्ध जाऊन ८० % पाणी पाकिस्तानला देण्यात आले. आपण भौगोलिक आणि रणनीतिकदृष्ट्या मजबूत स्थितीत असतानाही असा निर्णय झाला.

१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात जिंकलेला महत्त्वाचा भूभाग १९६६ च्या करारात पाकिस्तानला परत देण्यात आल्याची आठवणही त्यांनी करून दिली.

१९७१ च्या युद्धावर बोलताना शाह म्हणाले, इंदिरा गांधींनी पाकिस्तानचे दोन तुकडे करून ऐतिहासिक विजय मिळवला. ९३ हजार पाकिस्तानी सैनिक युद्धकैदी होते, आणि १५ हजार चौरस किलोमीटर भूभाग भारताच्या ताब्यात होता. पण शिमला करारात सगळं पाकिस्तानला परत देण्यात आलं आणि पीओकेचा मुद्दा कायमचा गुंतागुंतीचा झाला.

अमित शाह यांच्या या भाषणामुळे संसदेत काँग्रेसविरोधी वातावरण अधिक तापलं. ऐतिहासिक चुका उघड करत त्यांनी आजच्या सुरक्षाव्यवस्थेच्या प्रश्नांचे मूळ काँग्रेसच्या धोरणांमध्ये असल्याचं ठासून सांगितलं.

## 'प्रलय' क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

नवी दिल्ली : भारताच्या संरक्षण क्षेत्रात मोठं यश मिळालं असून, डीआरडीओने स्वदेशी बनावटीच्या 'प्रलय' बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची सलग दोन दिवस यशस्वी चाचणी केली आहे. २८ आणि २९ जुलै २०२५ रोजी घेतलेल्या या चाचण्या लष्कराच्या गरजेनुसार करण्यात आल्या असून, अल्प आणि मध्यम पल्ल्याच्या अचूक माऱ्याची क्षमता तपासण्यासाठी या चाचण्या केल्या गेल्या.



दोन्ही दिवस क्षेपणास्त्राने अपेक्षेप्रमाणेच निश्चित दिशेने उड्डाण करत लक्ष्य अचूक भेदलं. डीआरडीओने स्पष्ट केलं की, या चाचण्यांमध्ये सर्व निर्धारित मानके आणि उद्दिष्टांची पूर्तता झाली आहे.

'प्रलय' हे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे, जलद प्रतिसादक्षम आणि स्वदेशी बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे. हे कमी वेळेत डिप्लॉय होऊन, अचूकतेने आणि वेगाने शत्रूच्या लक्ष्यावर हल्ला करण्यास सक्षम आहे. या क्षेपणास्त्रामुळे भारतीय लष्कराच्या लहान पल्ल्याच्या माऱ्याची क्षमता आणखी वाढली असून, देशाच्या रक्षणसामर्थ्यात ठोस भर पडली आहे.

'प्रलय'च्या यशस्वी चाचणीमुळे भारताची स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानातील ताकद अधोरेखित झाली असून, युद्धस्थितीत जलद प्रतिसाद देण्याची क्षमता आता अधिक प्रभावी झाली आहे.

## सोशल मीडियातल्या 'चमको' कर्मचाऱ्यांवर सरकारचे अंकूश!
### महाराष्ट्र सरकारने कर्मचाऱ्यांसाठी सोशल मीडिया नियम केले कडक

मुंबई : महाराष्ट्रातील महायुती सरकारने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापरासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या निर्दे शांनुसार, राज्य आणि देशातील इतर सरकारांच्या सध्याच्या आणि भविष्यातील धोरणांवर टीका करण्यास स्पष्टपणे मनाई आहे. अधिकृत कागदपत्रे पूर्वपरवानगीशिवाय शेअर केली जाऊ शकत नाहीत, आणि कर्मचाऱ्यांना राज्य आणि केंद्र सरकारांनी प्रतिबंधित केलेल्या वेबसाइट्स आणि प्लिकेशन्स वापरण्यास मनाई आहे. या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

ही मार्गदर्शक तत्त्वे राज्य सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, परिषदा आणि सार्वजनिक उपक्रमांमधील कर्मचाऱ्यांवरही लागू आहेत, ज्यात कंत्राटी आणि बाह्यस्रोत कर्मचारी यांचा समावेश आहे. सरकारी ठरावात (ऋठ) फेसबुक आणि लिंक्डइन सारख्या सोशल नेटवर्किंग साईट्स, द (पूर्वीचे ट्विटर) सारख्या मायक्रोब्लॉगिंग साईट्स, इंस्टाग्राम आणि यूट्यूब सारख्या व्हिडिओ-शेअरिंग प्लॅटफॉर्म, व्हॉट्सप आणि टेलिग्राम सारख्या इन्स्टंट मेसेजिंग प्स आणि विकी आणि चर्चा मंच सारख्या सहकार्यात्मक साधनांसह विस्तृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा समावेश आहे.

सोशल मीडियाचा होतोय गैरवापर

सोमवारी जारी केलेल्या जीआरमध्ये, गोपनीय माहितीचा प्रसार, चुकीच्या माहितीचा प्रसार आणि चुकीची माहिती परत घेण्यात येणारी अडचण



यांसारख्या सोशल मीडियामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांची कबुली दिली आहे. त्यात म्हटले आहे, शासकीय सेवा नियमांचे उल्लंघन करून शासकीय धोरणांवर किंवा कोणत्याही राजकीय घटना किंवा व्यक्तीबद्दल प्रतिकूल टिप्पणी करण्यासारख्या प्रकारे सोशल मीडियाचा गैरवापर केला जात असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (रोजगार) नियम, १९७९, जे सरकारी कर्मचाऱ्यांच्या वर्तनाचे वर्णन करतात, ते आता सोशल मीडिया वापरासाठीही लागू होतील, असे सरकारी ठरावात म्हटले आहे. मार्गदर्शक तत्त्वे सरकारी कर्मचाऱ्यांना स्वतंत्र वैयक्तिक आणि अधिकृत सोशल मीडिया खाती ठेवण्याचे आणि सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करण्याचे निर्देश देतात. त्यांना केंद्र आणि राज्य सरकारांनी प्रतिबंधित केलेल्या वेबसाइट्स आणि प्स वापरण्यास मनाई आहे. सरकारद्वारे अधिकृत असलेले व्यक्ती, सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीने, सरकारी योजना आणि सार्वजनिक सहभाग वाढवण्यासाठी सरकारी माध्यमांचा वापर करण्यास परवानगी आहे.

या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असेही नमूद केले आहे की, कर्मचारी गोपनीय कागदपत्रे किंवा कार्यालयीन कागदपत्रे, अंशतः किंवा पूर्णपणे, मंजुरीशिवाय शेअर किंवा अपलोड करू शकत नाहीत. व्हॉट्सप आणि टेलिग्राम सारख्या मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वापर कार्यालयीन कामाच्या समन्वयासाठी केला जाऊ शकतो. कर्मचारी सरकारी योजनांच्या यशामध्ये योगदान देणाऱ्या सामूहिक प्रयत्नांबद्दल पोस्ट करू शकतात, परंतु त्यांनी आत्म-प्रशंसा टाळली पाहिजे. वैयक्तिक फोटो वापरण्याची परवानगी आहे, परंतु कर्मचाऱ्यांनी सरकारी नावे, लोगो किंवा सरकारी मालमत्ता जसे की वाहने आणि इमारतींचा वापर वैयक्तिक खात्यांवर फोटो किंवा व्हिडिओ अपलोड करताना टाळला पाहिजे. आक्षेपार्ह, द्वेषपूर्ण, अपमानास्पद आणि भेदभाव करणारी सामग्री प्रतिबंधित आहे. बदली झाल्यावर, कार्यालयाशी संबंधित सोशल मीडिया खाती तात्काळ हस्तांतरित करावी लागतील. या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणार्या कोणत्याही कर्मचाऱ्यावर

## माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांचा भाजपामध्ये प्रवेश

परभणी : परभणी जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यमंत्री सुरेश वरपुडकर यांनी मंगळवारी आपल्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी वरपुडकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत केले. प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, परभणीच्या पालकमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर, आ. तानाजी मुटकुळे, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, मराठवाडा विभागीय संघटन मंत्री संजय कोडगे, अमर राजुरकर, भाजपा जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, परभणी महानगर अध्यक्ष शिवाजी भरोसे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.



यावेळी चव्हाण म्हणाले की, सुरेश वरपुडकर हे सामाजिक बांधिलकी ठेवून काम करणारे व्यक्तिमत्व आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकर्तृत्वावर विश्वास ठेवून विकसित भारत आणि महाराष्ट्र घडवण्यासाठी या सर्वांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम बनवून, प्रत्येक क्षेत्रात राज्याला अव्वल बनवण्यासाठी भाजपा प्रयत्नशील आहे. दांडगा अनुभव पाठीशी असलेल्या वरपुडकर यांच्या पक्षप्रवेशाने परभणी जिल्ह्यात भाजपा संघटना अधिक मजबूत होईल. पक्षात प्रवेश केलेल्या सर्वांचा भाजपामध्ये सन्मान राखला जाईल अशी ग्वाही चव्हाण यांनी दिली .

यावेळी महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की सहकार क्षेत्रातील कार्य आणि समाजकार्यामुळे परभणी जिल्ह्याच्या राजकारणात चार दशकांपासून ठसा उमटवणारे वरपुडकर यांच्या भाजपा प्रवेशाने पक्ष संघटनेला बळ मिळेल.

## २६.३४ लाख महिला लाडकी बहीण योजनेतील झाल्या नावडत्या

मुंबई: राज्यात सर्वात प्रभावी ठरत असलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा आतापर्यंत १२ हप्ते जारी करण्यात आले आहेत. मात्र या दरम्यान, या योजनेसंबंधित मोठा घोटाळा उघडकीस आला, ज्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. या योजनेचा अनेक पुरुषही लाभ घेत असल्याचे समोर आल्यानंतर, सरकार आता संबंधित लोकांकडून पैसे वसूल करण्याची तयारी करत आहे.

जून २०२४ मध्ये, महाराष्ट्र सरकारने राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र महिला लाभार्थ्यांना दरमहा १,५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. मात्र तेव्हापासून आतापर्यंत एकूण १२ हफ्त्यांचा लाभ अपात्र लोकांना देखील मिळाला असल्यामुळे, राज्याच्या महसुलावर देखील



त्याचा ताण पडला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी एक निवेदन जारी केले आहे की पडताळणी दरम्यान असे आढळून आले की लोक अपात्र असूनही या योजनेचा लाभ घेत आहेत. अशा परिस्थितीत, राज्य सरकारने २६.३४ लाख अपात्र लोकांना योजनेतून काढून टाकले आहे.

अदिती तटकरे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर सांगितले की, तपासणीत असे दिसून आले की काही लाभार्थी अनेक योजनांचा लाभ घेत होते. काही कुटुंबांमध्ये दोनपेक्षा जास्त लाभार्थी होते. काही प्रकरणांमध्ये, पुरुषांनीही या योजनेसाठी अर्ज केले होते. त्या पुढे म्हणाल्या की, महिला आणि बालविकास विभागाने सर्व अर्जांची पात्रता तपासण्यासाठी सर्व सरकारी विभागांकडून माहिती मागवली होती. माहिती आणि तंत्रज्ञान विभागाने सांगितले की, अपात्र असूनही सुमारे २६.३४ लाख लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. इकॉनॉमिक टाईम्समध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार, २६.३४ लाख अपात्र लोकांची खाती तात्पुरती निलंबित करण्यात आली आहेत. याशिवाय, सुमारे २.२५ कोटी पात्र लाभार्थ्यांना जून २०२५ चा हप्ता मिळाला आहे.

लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांबाबत बोलताना तटकरे म्हणाल्या की, 'ज्या महिलेचे अकाऊंट नव्हते, त्यावेळी त्यांनी पुरुषांचे अकाऊंट दिले का? हा एक प्रश्न आहे.

## राज्यात २५ हजार प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरणार

मुंबई : राज्यातील जिल्हा परिषद शाळा मधील तब्बल २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे. राज्य शासनाने शाळांमधील संच मान्यता करण्यासाठी सुधारित शासन निर्णय १५ मार्च २०२४ रोजी निर्गमित केला होता त्याचा हा परिणाम असल्यास सांगण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगर आदर्श शिक्षक समितीचे संस्थापक अध्यक्ष दिलीप ढाकणे यांनी ही माहिती दिली. त्यांच्या मते, एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातच ५१५ शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे.

पूर्वीच्या संच मान्यतेनुसार, २० पटसंखेच्या शाळेत एकच शिक्षक आणि एक सेवानिवृत्त शिक्षक नियुक्त करण्याची तरतूद होती. तसेच पूर्वी पहिली ते पाचवीच्या वर्गात ६१ विद्यार्थी असतील तर तीन शिक्षकांची तरतूद होती. मात्र, नव्या नियमात हा आकडा ७६ वर्गाला आहे.

## राज्य निवडणूक आयुक्तांकडून महानगरपालिका निवडणुक तयारीचा आढावा




छत्रपती संभाजीनगर, दि.२९ : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक पूर्वतयारीबाबत आज राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आढावा घेतला.

विभागीय आयुक्त कार्यालयात आज महानगरपालिका निवडणुकीबाबत विभागातील पाचही महानगरपालिका आयुक्तांशी सर्व सोईसुविधा, मतदान केंद्र, कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, मतदान केंद्र, शासकीय, निमशासकीय ठिकाणे, खाजगी ठिकाणे याबाबतच्या तयारीचा आढावा घेतला.

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका आयुक्त जी.श्रीकांत, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जालनाचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जालना महानगर पालिका आयुक्त संतोष खांडेकर, नांदेड महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे, परभणी महानगरपालिका आयुक्त महेश जाधव, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, लातूर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना उपस्थित होते.

निवडणुकीसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने २६ जून, २०२५ रोजीच्या आदेशानुसार आवश्यक केलेल्या सोईसुविधांचा आढावा घेऊन सोईसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत मनपा आयुक्तांनी माहिती दिली.

निवडणूक आयुक्त श्री.वाघमारे म्हणाले की, मतदार यादी तयार करणे हेच या निवडणुकीतील महत्वाचे काम आहे. त्या प्रभागातील मतदार त्याच प्रभागात मतदान करतील याकडे मतदार यादीचे विभाजन करताना कटाक्षाने लक्ष द्यावे. महानगरपालिकांना आवश्यक ईव्हीएमची उपलब्धता करून देण्यात येणार असून साठवणूकीची जागा आणि वापरलेले ईव्हीएम वेगवेगळ्या ठिकाणी ठेवावेत. निवडणुकीच्या अनुषंगाने वेबसाईट व प अद्ययावत करण्यात आले असून या दोन्हीचा वापर करता येईल. या पचा व वेबसाईचा सर्वसाधारण मतदारालाही वापर करता येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त जी.श्रीकांत यांनी सीसीटीव्ही यंत्रणेबाबत माहिती दिली. यावेळी निवडणूक यंत्रणेशी सबंधित अधिकारी उपस्थित होते.

## विष प्राशन केल्याने शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

सिल्लोड प्रतिनिधी

सिल्लोड : तालुक्यातील के-हाळा येथील भास्कर तुकाराम बोलकर (वय ४३) या शेतकऱ्याचा तणनाशक विष प्राशन केल्याने रविवारी रात्री २ वाजता घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २३ जुलै रोजी दुपारी दोनच्या सुमारास भास्कर बोलकर आपल्या शेतात काम करत असताना त्यांनी टॉर्च (ढजठउ-) या कंपनीचे तणनाशक विष प्राशन केले होते ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्यांना सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल केले होते

घाटी रुग्णालयातील अपघात विभागात त्याच्यावर उपचार सुरू असताना रविवारी रात्री त्याचा मृत्यू झाला. मृत भास्कर याच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.या प्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस नाईक पवार करीत आहेत.

## विजेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू
### महावितरणच्या हलगर्जीपणामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.२९ जुलै - कन्नड तालुक्यातील विठ्ठलपूर शिवारात सोमवारी दि.२८ सायंकाळी विजेचा शॉक लागून एका इसमाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. ज्ञानेश्वर रामभाऊ धनवई (टोपणनाव गफूरिया, वय ४५, रा. शेफेपुर, ता. पिशोर) असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांच्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास ज्ञानेश्वर धनवई हे कन्नड बायपास मार्गे विठ्ठलपूरकडे जात असताना सुगडी साखर कारखान्याजवळ रस्त्यावर वीज वाहिनीची तुटलेली तार आडवी पडलेली होती. अपघाताचा धोका असलेली ही तार अंधारामुळे त्यांच्या लक्षात आली नाही. त्या तारेचा स्पर्श होताच त्यांना जबरदस्त विजेचा धक्का बसला आणि ते जागीच कोसळले. जवळपास एक तास ते घटनास्थळीच अचेत अवस्थेत पडून होते.

ही बाब गावचे पोलीस पाटील मुरलीधर गायके यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ कन्नड शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. तत्परतेने पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने ज्ञानेश्वर यांना रुग्णवाहिकेद्वारे कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, धनवई कुटुंबियांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यावर वीज वाहिनीची तार तुटून पडलेली असूनही महावितरणकडून कोणतीही खबरदारी घेण्यात आलेली नव्हती, ही बाब अतिशय गंभीर आहे.

महावितरणच्या हलगर्जीपणाकडे बोट

सदर घटना ही महावितरणच्या दुटप्पी कारभाराची सजीव साक्ष आहे, असे नागरिकांतून बोलले जात आहे. रस्त्यावर तुटून पडलेल्या विद्युत तारा, वेळेवर दुरुस्ती न होणे, आणि लोकांच्या सुरक्षिततेबाबत अनास्था - या सर्व गोष्टींमुळेच आज एक जीव गमवावा लागला. यावर जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## नांदेडमध्ये मद्यधुंद कारचालकाने उभ्या वाहनांना चिरडले; दोघे गंभीर जखमी

नांदेड : नांदेड शहरात आज दुपारी एक भीषण हिट अँड रन अपघात घडला, ज्यामध्ये एका मद्यधुंद कारचालकाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात एक दुचाकीस्वार आणि एक रिक्षाचालक गंभीर जखमी झाले आहेत, तर इतर वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात नांदेड शहरातील भाग्यनगर कॉर्नरजवळ घडला. भरधाव वेगाने आलेल्या एका कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दोन ऑटो रिक्षा, एक मारुती कार, एक बुलेट आणि इतर काही दुचाकींना अक्षरशः उडवले. हा थरार पाहून आजूबाजूच्या नागरिकांच्या अंगाचा थरकाप उडाला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, दोघांची प्रकृती गंभीर आहे. अपघातात बुलेट चालक आणि एका ऑटो रिक्षाचालकाला गंभीर दुखापत झाली असून त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शहरात बेशिस्त ऑटोरिक्षा चालकाविरूध्द विशेष मोहिम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
लातूर शहरातील बेशिस्त ऑटो चालकावर वाहतुक शाखेने कारवाईचा बडगा उभारला आहे.

शहरात ऑटो रिक्षाची संख्या जास्त असुन त्यात चालक सर्रासपणे वाहतुक नियमांचे उल्लंघन करीत आहेत. रिक्षामध्ये चालकाचे बाजुस फ्रंटशिटला प्रवासी घेणे, गणवेष परिधान न करणे, शहरात रोडवर बेशिस्तपणे कोठेही थांबून प्रवासी चढ-उतार करणे, चौका-चौकांमध्ये वळणावर प्रवासी घेण्यासाठी ऑटो रिक्षाची दुहेरी रांग करुन थांबवणे इत्यादीमुळे सामान्य नागरिकांना विनाकारण रहदारीस अडचण निर्माण होवून त्रास होत असल्याच्या तक्रारी येत होत्या.

फ्रंटशिट घेण्याऱ्या, गणवेश परिधान न करणाऱ्या, अशा बेशिस्त ऑटो चालकावर मोटार वाहन अधिनियमान्वये कार्यवाही करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधिक्षक,मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी, (लातूर शहर) रणजीत सावंत, यांचे मार्गदर्शनाखाली वाहतुक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक बुद्धीराज सुकाळे यांचे नेतृत्वात विशेष मोहिम राबविण्यात येत आहे यात १) बेशिस्त पणे फ्रंटशिट घेणाऱ्या ऑटो रिक्षा चालकावर दररोज २०-२५ केसेस केल्या जात असुन त्यांचेकडून फ्रंटशिटचे दंडासह मागील संपुर्ण अनपेड दंड जमा करून घेण्यात येत आहे. २) गणवेष परिधान न करणाऱ्या ऑटो रिक्षा चालकांवरही कडक कार्यवाही चालू असून ३६८ ऑटो चालकावर केसेस करण्यात आल्या असुन ३,३०,३००/- रुपये दंड आकारण्यात आला आहे. यापुढेही मोहिम चालू आहे. ३) पेट्रोल ऑटोरिक्षामध्ये अनाधिकृतपणे बदल करुन विना परवाना एलपीजी किट बसवणाऱ्या ऑटो रिक्षा चालकावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



### संक्षिप्त वृत्त...

## बालनाट्य दिनानिमित्त रंगभूमी उत्सव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
मराठी बालनाट्यांचे सर्वाधिक प्रयोग महाराष्ट्रात होतात. २ ऑगस्ट १९५९ रोजी पहिल्या व्यावसायिक बालनाट्याचा प्रयोग झाला, म्हणून बालरंगभूमी परिषदेतर्फे २ ऑगस्ट हा 'मराठी बालनाट्य दिवस' म्हणून साजरा करणार असल्याची माहिती बालरंगभूमी परिषद, लातूर शाखेच्या अध्यक्षा सुमती बिडवे -सोमवंशी यांनी दिली.

बालरंगभूमी परिषद ही अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न संस्था असून, या संस्थेतर्फे महाराष्ट्रातील सर्व शाखांमध्ये मराठी बालनाट्य दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. मराठी बालनाट्य दिवसानिमित्त बालरंगभूमी परिषद, लातूर शाखेतर्फे एकपात्री अभिनय, वेशभूषा, नाट्यछटा या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेचे नवलाजी जाधव, मयूर राजापूरे, रणजीत आचार्य, रवी अघाव, हिरा वेदपाठक, सुवर्णा बुरांडे, वनिता गोजमगुंडे, तेजश्री घवले, हिरा सावंत, प्रीती ठाकूर, भीम दुनगावे, शरीफ पठाण, आकाश वाटवडे व सदस्यांनी केले आहे.

## सूरज चव्हाणने गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला : घाडगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
'छावा'चे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना मारहाण करणाऱ्या आरोपी सूरज चव्हाण याने गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्याविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचे कलम वाढवावे, यासह अन्य बारा आरोपींमध्ये वाढ करण्याची मागणी करणारा लेखी पुरवणी जबाब वकिलांमार्फत घाडगे यांनी पोलिसांकडे सादर केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या सूरज चव्हाणसह अन्य कार्यकर्त्यांनी 'छावा'चे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करीत गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. आरोपींचे जामीनही झाले आहेत. परंतु, मारहाणीवेळी सूरज चव्हाण याने विजयकुमार घाडगे यांचा गळा दाबून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करावा, त्याचप्रमाणे मारहाणीवेळी अन्य आरोपीही होते. त्यांच्यावरही गुन्हे दाखल करून त्यांना आरोपी करावे, अशी मागणी करणारा पुरवणी जबाब विजयकुमार घाडगे यांनी वकिलांमार्फत विवेकानंद चौक पोलिसांकडे दिला आहे. त्याचप्रमाणे दीपक नरवडे आणि मनोज लंगर यांनीही त्यांचे जबाब पोलीस ठाण्यात जाऊन दिले आहेत.

## तज्ज्ञ संचालकपदी ॲड. परिक्षीत पवार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
येथील यशवंत नागरी सहकारी बँकेच्या तज्ज्ञ संचालकपदी औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांचे चिरंजीव ॲड. परीक्षित पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची सभा शनिवारी चेअरमन प्रा. सुहास पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन सूर्यभान पाटील, संचालक प्रा. वसंत पाटील, राजेंद्र कोळगे, विष्णुपंत साठे, प्रा. राजकुमार जाधव, चंद्रकांत साळुंके, प्रा. धर्मराज तांदुळजेकर, सुरेश राठोड, ॲड. आदिमाया गवारे यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी श्याम कापसे आदी उपस्थित होते. या निवडीनंतर ॲड. पवार यांचा बँकेतर्फे सत्कार करण्यात आला.

## कारगिल युध्दातील शहिदांना श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
कारगिल विजय दिनानिमित्त महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील राष्ट्रीय छात्र सेना व लातूर येथील एनसीसी बटालियन, उदगीर येथील छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कारगिल युध्दातील शहीद कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांच्या स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी एनसीसी कंपनी कमांडर डॉ. राम साबदे, एनसीसी बटालियन, लातूरचे नायब सुभेदार बाजीराव पाटील, तहसीलदार राम बोरगावकर, चंदन पाटील नागराळकर, शिवाजी होळकर, संभाजी शिंदे, बालाजी मुस्कावाड, प्राचार्य वसंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## गोलाईतील अतिक्रमणांवर कारवाई



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
शहरातील प्रमुख व्यापारपेठ असलेल्या गंजगोलाईसह संपूर्ण परिसरात हातगाडी व्यापारी व छोट्या व्यावसायिकांनी अतिक्रमणे केली आहेत. यामुळे वाहनांनाच नव्हे तर पादचाऱ्यांनाही रस्ता मिळत नाही. त्यातच प्रवासी रिक्षा चालकांनी गंजगोलाईचा परिसर वेढून टाकला आहे. या कोंडमाऱ्याला सामान्य माणूस अक्षरशः वैतागला आहे. यातून कायमचा तोडगा काढण्याची मागणी होत होती.

सोमवारी शहर वाहतूक नियंत्रण शाखेने 'आरसीपी'चे कर्मचारी घेऊन गंजगोलाई भागातील अतिक्रमणांवर कारवाई केली. यामुळे आज तरी गंजगोलाई व परिसरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतल्याचे दिसून आले.

गंजगोलाईच्या ७० फुटी सर्कलमध्ये हातगाडी व्यापारी व भाजीपाला विक्रेत्यांनी अतिक्रमणे केली आहेत. यातच भरीस भर म्हणून पूर्व भागाकडे जाणारे प्रवासी रिक्षाही रांगा करून भर रस्त्यावर थांबत आहेत. यामुळे गंजगोलाईतून नांदेड रस्त्याकडे जाण्यास वाहनधारकांसह पादचाऱ्यांनाही जागा मिळत नाही. विशेष म्हणजे गोलाईमध्ये संपूर्ण जिल्ह्यातील नागरिक खरेदीसाठी येतात. त्यांना रस्ता ओलांडणेही अवघड होत आहे. सुरुवातीला गोलाईच्या कोपऱ्यात लागणारे हातगाडेवाले संपूर्ण रस्ताच व्यापून टाकत आहेत. यामुळे गांधी चौकाकडून नांदेड रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनधारकांना रस्ताच मिळत नाही. पादचाऱ्यांनाही चालण्यासाठी कसरत करावी लागत आहे.

गोलाईच्या सर्कलच्या कडेने थांबलेल्या हातगाड्यांच्या पुढे प्रवासी रिक्षा रांगा लावतात. एकाचवेळी दोन-दोन रांगा लागत असल्याने इतर वाहनांना रस्ताच मिळत नाही. यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते.एखादा सामान्य माणूस हातगाडी व रिक्षा चालकांना बाजुला घे म्हणाला तर रिक्षाचालक व हातगाडीवाले त्याच्या अंगावर धाऊन जात आहेत. याला सामान्य नागरिक वैतागले आहेत. विशेष म्हणजे गंजगोलाईच्या ७० फुटी सर्कलमध्ये एकही व्यापारी बसू देऊ नका, असे आदेश महापालिकेला न्यायालयाने दिले आहेत. तरीही गोलाईचा श्वास कोंडत आहे. याबाबत ओरड सुरू असताना सोमवारी शहर वाहतूक नियंत्रण शाखेने 'आरसीपी'चे कर्मचारी घेऊन गंजगोलाई भागातील अतिक्रमणांवर कारवाई केली. यामुळे तुर्तास तरी परिसरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतल्याचे दिसून आले.

## श्रावणी सोमवारनिमित्त शिवमंदिरात भक्तांच्या रांगा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
श्रावण महिन्यातील पहिल्याच सोमवारी शहरासह जिल्ह्यातील शिव मंदिरांमध्ये महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. यामुळे मंदिरांचे परिसर भाविकांच्या भक्तीने ओसंडून वाहताना दिसून आले.

श्रावण महिना मराठी वर्षातील सर्वात पवित्र महिना मानला जातो. पावसाळा सुरू होऊन दीड महिना उलटला असल्याने सर्वत्र निसर्ग हिरवा शालू पांघरलेला असतो. प्रसन्न वातावरणात श्रावण महिन्याला प्रारंभ होतो. हा महिना भक्तीभावाचा महिना म्हणून सर्वपरिचित आहे. या महिन्यात हिंदू धर्मात कोणताही मांसाहार वर्ज्य आहे.

श्रावण मासानिमित्त अनेक मंदिरांमध्ये पोथी-पुराणांचे पठण करण्यात येते. अनेकजण संपूर्ण महिना आपल्या घरी पोथीचे पारायण करतात. रामायण, महाभारत असे पोथीचे अध्याय वाचले जातात. या महिन्यात पावसाच्या संततधाराही सर्वत्र बरसत असतात. यामुळे वातावरण प्रसन्न असते. त्याचप्रमाणे भक्तीला उधान आलेले असते. श्रावण महिन्यातील सोमवारला अधिक महत्त्व आहे. प्रत्येक भाविक महादेवाची पूजा करतात. त्यांना बेल, फूल वाहतात. मंदिरांमध्ये जाऊन सहकुटुंब दर्शन घेताना दिसतात.

पहिल्या श्रावण सोमवारी ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिरासह शहरातील प्रसिध्द असलेल्या तळ्यातील वैद्यनाथ महादेव मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. पहाटेपासूनच हजारो भाविकांनी रांगा लावून पहिल्या सोमवारी श्री सिध्देश्वर आणि वैद्यनाथ महादेवाचे दर्शन घेतल्याचे दिसून आले. यामुळे मंदिर परिसर भक्तीभावाने न्हाऊन निघाला होता.

यानिमित्त शिवमंदिराला मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. पूजेचे साहित्य व लहान मुलांसाठी खेळणे विक्रेते, प्रसादाचे पेढे विक्रेते यांनी दुकाने थाटली होती. यामुळे परिसर गजबजून गेला होता. पहिल्या सोमवारनिमित्त हजारो भाविकांनी महादेवाचे दर्शन घेऊन आशीर्वाद मागितले. आता श्रावण महिन्यातील दर सोमवारी या मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी होणार आहे.

## संच मान्यतेसाठी यावर्षीही ३० सप्टेंबर ची पटसंख्या ग्राह्य धरावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
शासनाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ साठी दि. ३१ जुलै २०२५ ची पटसंख्या ग्राह्य धरण्यात येईल असे कळविण्यात आले होते. परंतु असे न करता दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दि. ३० सप्टेंबर चीच पटसंख्या ग्राह्य धरण्यात यावी, अशी आग्रही मागणी शिक्षा महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे राज्य चिटणीस लायक पटेल यांनी केली आहे.

राज्यामध्ये आतापर्यंत दरवर्षी ३० सप्टेंबरची पटसंख्या ग्राह्य धरून संचमान्यता करण्यात येत होती. परंतु शैक्षणिक वर्ष २०२५ २६ साठी दि. ३१ जुलैची पटसंख्या ग्राह्य धरण्यात येईल, असे शासनाच्या वतीने कळविण्यात आले होते. यामुळे राज्याच्या शैक्षणिक वर्तुळात एकच गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. कारण अजून सगळीकडेच इयत्ता पहिली ते बारावीचे प्रवेश सुरु आहेत. आधारकार्ड काढणे,जन्म नोंदणी दाखले वेळेत मिळत नाहीत.

ग्रामीण भागात शेतकऱ्यांची कामे सुरु असल्याने प्रवेश कागद पत्र वेळेत मिळत नाहीत. शिक्षक बदली होत आहेत. त्यातच इयत्ता अकरावीचे यावर्षी पासून ऑनलाइन प्रवेश सुरू केल्यामुळे त्यात अनेक तांत्रिक दोष असल्यामुळे पन्नास टक्केही प्रवेश आजपर्यंत होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे ३१ जुलैला सुद्धा राज्यात हजारो विद्यार्थी यूडाइसच्या बाहेर राहणार असल्याकारणामुळे ही मुदत पूर्वीप्रमाणे ३० सप्टेंबर २०२५ करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## उपजिल्हा रुग्णालयाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करावे : आमदार रमेश कराड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
तालुक्यातील मुरुड येथे महायुती शासनाने मंजूर केलेल्या २५ कोटी ४७ लाख रुपये खर्चाच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाची लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड यांनी पाहणी करून सदरचे काम गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावे, अशा सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदारांना दिल्या.

लातूर तालुक्यातील मुरुड आणि परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे भाजप नेते आमदार रमेश कराड यांच्या प्रयत्नातून मागील काळात महायुती शासनाने उपजिल्हा रुग्णालयास श्रेणीवर्धन विशेष बाब म्हणून मान्यता दिली. सदर कामासाठी २५ कोटी ४७ लाख रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे प्रत्यक्षात काम सुरू झाले असून, या नियोजित दोन मजली ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय इमारतीत विविध तपासणी विभाग, प्रयोगशाळा, रक्तपेढी, अपघात विभाग, औषधालय, नाव नोंदणी, भांडार विभाग, प्रतीक्षालय, प्रशासकीय कार्यालय, शस्त्रक्रिया कक्ष, डॉक्टर व आधिपरिचारिका यांचे कक्ष असे सुसज्ज बांधकाम करण्यात येणार आहे. या कामाची आमदार रमेश कराड यांनी नुकतीच पाहणी केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एस. के. तांबोळी आणि ठेकेदार अभिषेक हलकुडे यांनी बांधकामाच्या कामाबाबतची माहिती दिली. सदरील काम गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावे, अशा सूचना आमदार रमेश कराड यांनी दिल्या.

यावेळी तहसीलदार सौदागर तांदळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आर. व्ही. गलांडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्वेता शेळके, कनिष्ठ अभियंता ए. बी. वाघमारे, विक्रम शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, सरपंच अमृता नाडे, उपसरपंच हनुमंत नागटिळक, सूरज शिंदे, वैभव सापसोड, नीता मगरे, बन्सी भिसे आदी उपस्थित होते.

### आज जनता दरबार

आमदार कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत ३० जुलै २०२५ बुधवार रोजी लातूर तालुक्यातील मौजे महमदापूर येथे जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे.
दर तीन महिन्याला लातूर ग्रामीण मतदार संघात चार ठिकाणी जनता दरबार घेण्यात येणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी घोषित केले आहे.

३० रोजी तालुक्यातील मौजे महमदापूर येथे भातांगळी, बोरी, महापूर, महाराणा प्रताप नगर या पंचायत समिती गणातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ. कराड यांच्या उपस्थितीत जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील जनता दरबार ममदापूर पाटी येथील श्री हनुमान मंदिर सभागृह येथे सकाळी १० वाजता जनता दरबार होणार आहे.

## विद्यार्थिनींसाठी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
विलासराव देशमुख फाउंडेशनच्यावतीने 'ट्वेंटीवन ॲग्री'च्या संचालिका अदिती देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थिनींना स्वसंरक्षण करता यावे, यासाठी शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील डॉ. जाकीर हुसेन कन्या हायस्कूल या ठिकाणी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

विलासराव देशमुख फाउंडेशनच्यावतीने मागील काळात सर्व सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण केंद्रांमधून ७२० मुली व ३७८ मुले अशा एकूण १०९८ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सेल्फ डिफेन्स कोर्सच्या माध्यमातून मुलींना आत्मसंरक्षणाचे विविध प्रकारचे धडे यात दिले जाणार आहेत. या कोर्सच्या माध्यमातून मुलींचे मनोधैर्य वाढवण्याचा प्रयत्न करणे, त्याचबरोबर मुलींची शारीरिक मजबुती, मानसिक शक्ती वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शहरातील प्रभाग क्रमांक ५ मध्ये शुभारंभ करण्यात आलेल्या या प्रशिक्षण केंद्राचा कोल्हेनगरसह परिसरातील मुलींना फायदा होणार आहे.

या प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन ॲड. किरण जाधव, विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, संस्थेचे सचिव के. एस. कादरी, मुख्याध्यापक आर. आर. सिद्दीकी यांच्यासह शिक्षक, संस्थेचे सोशल प्लॅनर गजानन बोयणे तसेच प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## निवृत्तीवेतन धारकांनी कागदपत्रे जमा करावीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक व कुंटूंब निवृत्तीवेतनधारक यांनी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत जारी करण्यात आलेल्या परिपत्रक क्रमांक ०९/२०२५ नुसार आपले आधारकार्ड सोबत पॅनकार्ड दि. ३० सप्टेंबर, २०२५ पूर्वी संलग्न (लिंक) करावे.

विहीत मुदतीत आधारकार्ड व पॅनकार्ड संलग्न न केल्यास ऑक्टोबर २०२५ च्या निवृत्तीवेतनातून व कुंटूंब निवृत्तीवेतनातून आयकर कायद्यान्वये जास्तीचा आयकर कपात करण्यात येईल, असे जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील व अप्पर कोषागार अधिकारी के.एन. खोजे यांनी कळविले आहे.

## केवळ ३ दिवसात १००० हून अधिक मालमत्ता धारकानी घेतला सूटचा लाभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२९ जुलै -**
कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत वर्षाच्या सुरुवातीस नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कर online भरणाऱ्यास १० % व ऑफलाइन भरणाऱ्यास ५% सवलत देण्यात आली आहे .

सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून शनिवार, रविवार सुटीच्या दिवशी सुद्धा १००० हून अधिक नागरिकांनी आपला टॅक्स भरून सुट चा लाभ घेतला .

मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांच्या नियोजनानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सुट्टीच्या दिवशी सुद्धा कर संकलनाचे आदेश दिले होते.

त्यानुसार सर्व क्षेत्रीय अधिकारी व टॅक्स विभागाचे कर्मचारी यांनी मेहनत घेऊन सुट्टीच्या दिवशी सुद्धा नागरिकांना टॅक्स भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. शनिवार ते सोमवार या ३ दिवसात तब्बल १ हजार हून अधिक मालमत्ता धारकानी ३.५ लाख सूट रकमेचा लाभ घेऊन आपला ९० लाख रुपयांचा टैक्स भरणा केला आहे.

तरी चालू वर्षातील मालमत्ता धारकांसाठी ही शेवटची संधी असल्याने ३१ जुलै पूर्वी आपला टैक्स भरून सूट चा लाभ घ्यावा व सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त (कर संकलन) डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

कर भरणा करण्यासाठी mclatur.org, Latur Property Tax सिटीझन ॲप किंवा propertytax. mclatur.in या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# 'गेट गोईंग' मॅरेथॉन ३ ऑगस्ट रोजी महिलांच्या आरोग्याविषयी जागृती

छत्रपती संभाजीनगर : 'गेट गोईंग' मॅरेथॉन ३ ऑगस्ट रोजी होणार असून मॅरेथॉनचे हे तेरावे वर्ष आहे. महिलांचे सक्षमीकरण, आरोग्यसाठी रन फॉर हर हा उपक्रम गेट गोईंग गेटगोइंग वुमन फॉर फन फिटनेस एंड हेल्थ सातत्याने राबवत महिलांना स्वताच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याप्रती जागरूक करत आहे. पीईएस कॉलेजचे स्टेडियम मिलिंद परिसर, होली क्रॉस मराठी शाळेच्या समोर, छावणी येथून सकाळी ६ वाजता मॅरेथॉनला सुरुवात होईल. १०,५, आणि ३ किलोमीटर अंतरासाठी मॅरेथॉन होणार आहे. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. महिलाच्या आरोग्याच्या बाबतीत पुरुषांची भूमिकाही तेव्हढीच महत्वाची असल्याने मॅरेथॉन मध्ये पुरुषांचा सहभाग वाढवण्यात येत आहे तरी आजही या मॅरेथॉनमध्ये महिलांची संख्या ५० टक्के असते. ३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या १५०० हून अधिक नोंदणी झाली आहे. या सर्व सहभागी व्यक्तींना २ ऑगस्ट रोजी मोंढा नाका येथील ओ टू हायपरफिट जिम फिटनेस येथे सकाळी ११ ते ४ यावेळात टी शर्ट आणि बिब चे वाटप होणार आहे. मॅरेथॉनसाठी एमजीएम मेडिकल कॉलेज अँड रिसर्च सेंटर तसेच एमजीएम कॉलेज फॉर फ़िजिओथेरीपी हेल्थ पार्टनर म्हणून काम करणार आहे. एनर्झालतर्फे स्पर्धकांना एनर्जी ड्रिंक देण्यात येणार आहे तर क्लाऊड नाईनने प्रिंटींगची जबाबदारी सांभाळली आहे.

मॅरेथॉन यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रिया देशमुख, डॉ. चारुशीला देशमुख, डॉ. उमा महाजन, डॉ. नीती सोनी, डॉ. सुजाता लाहोटी, डॉ. भावना लोहीया, डॉ. संतोष तोतला, नीना निकाळजे, दीपाली डबरी, आरती अग्रवाल, निरुपमा नागोरी, डॉ. वंदना मिश्रा, डॉ. संगीता देशपांडे, अर्चना शिंदे, . उमा भोसले, डॉ. उमा भानसाळी, डॉ. सारा खियानी प्रयत्न करत आहेत.

## लिम्ब आणि स्पाइन सर्जरीनंतर मिळाले जीवनदान

सातारा : निवासी इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडलेल्या व गंभीर दुखापतींसह बेशुद्ध अवस्थेत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलेल्या एका १३ वर्षीय मुलाचे प्राण वाचविण्यात खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांना यश आले. मुलाच्या शरीराच्या संपूर्ण डाव्या बाजूला गंभीर मार लागला होता, यात मांडीचे हाड (फेमर), हात, पाऊल आणि पेल्व्हिसला झालेले फ्रॅक्चर, अंतर्गत रक्तस्त्राव आणि मणक्याला झालेल्या दुखापतीचा समावेश होता. हॉस्पिटलमध्ये दाखल करतेवेळी त्याचा रक्तदाब ५०मिमीएचजी इतका होता तर हिमोग्लोबीनची पातळी अत्यंत खाली म्हणजे ५स/वङ वर पोहोचली होती.अंतर्गत रक्तस्त्रावामुळे आणि प्लेटलेट्सची संख्या कमी झाल्याने मुलाची स्थिती प्रचंड खालावली होती. त्याच्या हाताचे व मांडीचे फ्रॅक्चर बसविण्यासाठी दुपारी १२ वाजल्यापासून ते दुपारी तीन वाजेपर्यंत तीन तास इमर्जन्सी शस्त्रक्रिया करण्यात आली.

## एसएईएल महाराष्ट्रातील बीड येथे सुरू केला ५० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प

बीड, २९ जुलै : एसएईएल इंडस्ट्रीज लिमिटेड पूर्ण स्वामित्वातील उपकंपनी एसएईएल सोलर आरई प्रायव्हेट लिमिटेड महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात ५० मेगावॅट (एसी) क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. या ग्राउंड-माउंटेड सौर प्रकल्पात टॉपकॉन बायफेशियल मॉड्यूल्सचा समावेश असून हे मॉड्यूल्स उच्च ऊर्जा उत्पादन आणि विश्वासार्ह कामगिरी यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.भारताच्या अक्षय ऊर्जा क्षमतेत भर घालत हा प्रकल्प दरवर्षी १०० गिगावॅट-तासांहूनअधिक स्वच्छ वीज निर्माण करण्याची अपेक्षा आहे. सरकारच्या शाश्वत ऊर्जा भविष्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेला हा उपक्रम कमी-कार्बन अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या देशाच्या बांधिलकीला बळकट करतो.

## ईसीजीसी लि.ने इलेक्ट्रिक वाहने दान करून अक्षयपात्रच्या शाश्वत कामकाजांना दिली गती

ठाणे - अक्षयपात्र हा जगातील सर्वात मोठा एनजीओ संचालित शाळांसाठीचा भोजन उपक्रम आहे. तसेच भारत सरकारच्या पीएम पोषण अभियानात ही संस्था अंमलबजावणी भागीदार आहे. ईसीजीसी लि.तर्फे अत्यंत महत्त्वाचे दान मिळाल्याचे या संस्थेने उत्साहाने जाहीर केले आहे. यात तीन महत्त्वाच्या केंद्रांवर त्यांच्या भोजन सेवेला बळकटी देण्यासाठी ७ इलेक्ट्रिक वाहने तैनात करण्यात आली आहेत. भारताच्या भावी पिढ्यांना सेवा देताना शाश्वतता आणि परिणामकारकता जपण्याची एकत्रित बांधिलकी या लक्षणीय सहभागामुळे अधोरेखित झाली आहे. कामकाजात अधिक शाश्वतता आणून पर्यावरणावरील परिणाम कमी करण्यावर भर देत ईसीजीसी लि.ने भुवनेश्वरसाठी ५ इलेक्ट्रिक वाहने आणि ठाणे आणि कल्याणसाठी प्रत्येकी एक वाहन दिले आहे. ही अत्याधुनिक वाहने १० ते १३ शाळांमधील सुमारे १००० ते २००० मुलांना रोज सक्षमपणे पोषक आहार पोहोचवण्यास सज्ज आहेत. ईसीजीसी लि. चे महाव्यवस्थापक श्री. कुमार अंशुमन यांनी जारी केलेल्या उद्दिष्ट पत्रात नमूद केल्यानुसार, ईसीजीसी लि.मध्ये आमचा ठाम विश्वास आहे की समाजघटकांचा विकास करताना पर्यावरणाचे जतन करणे हीच खरी प्रगती आहे.

## बंधन बँकेतर्फेनवीन शाखेचे उद्घाटन

पुणे: बंधन बँकने आज महाराष्ट्रातील पंढरपूर येथे आपल्या नवीन शाखेच्या उद्घाटनाची घोषणा केली. या शाखेचे उद्घाटन पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. महेश रोकडे आणि बंधन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पार्था प्रतिम सेनगुप्ता यांच्या उपस्थितीत केले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये श्री. सचिन लंगुटे, उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांचा समावेश होता.शाखा नेटवर्कचा विस्तार हा बंधन बँकच्या देशभरातील स्थान मजबूत करण्याच्या आणि विविधतेवर भर देण्याच्या धोरणात्मक दृष्टिकोनाचा भाग आहे. पंढरपूरसारख्या प्रमुख तीर्थक्षेत्री नवीन शाखा सुरू केल्यामुळे बँकेला स्थानिक रहिवासी, व्यावसायिक तसेच मंदिराला भेट देणाऱ्या भाविकांच्या विविध आर्थिक गरजांची अधिक चांगल्या प्रकारे पूर्तता करणे शक्य होईल. हा उपक्रम आधुनिक आणि ग्राहक-केंद्रित उपाय सुविधा पुरविण्याच्या बँकेच्या व्यापक ध्येयाशी सुसंगत आहे. या उद्घाटनानंतर, बँकेची महाराष्ट्रात ३५० हून अधिक आणि संपूर्ण भारतात ६,३५० पेक्षा अधिक बँकिंग आऊटलेट्स झाली आहेत.

## 'पीएनजी ज्वेलर्स'च्या 'मंगळसूत्र महोत्सवा'चा एकविसावा वर्षपूर्ती सोहळा

महाराष्ट्रातील घराघरांमध्ये परंपरेसह, विश्वासाने घेतले जाणारे नाव, पीएनजी ज्वेलर्स यांचा प्रतिष्ठित आणि बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सव' यंदा २१ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या वर्षी पहिल्यांदाच १८ कॅरेट सोन्यातील मंगळसूत्रे पीएनजी ज्वेलर्सने ग्राहकांसाठी उपलब्ध केली आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंगळसूत्र महोत्सवात पारंपरिकता आणि आधुनिकतेचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे. ७ वेगवेगळ्या प्रकारांत - पारंपरिक, आधुनिक, हलक्या वजनाचे, ऐतिहासिक, पोल्की, हिरे आणि गोकाक यांचे २००० हून अधिक डिझाइन्स महाराष्ट्र आणि गोव्यातील पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये सादर करण्यात येणार आहेत.

## 'तारक मेहता का उल्टा चश्मा' आजही भारताची अत्यंत आवडती कौटुंबिक मालिका

भारतीय टेलिव्हिजनवर सर्वात जास्त चाललेली आणि सोनी सबचा अभिमान असलेली 'तारक मेहता का उल्टा चश्मा' ही कौटुंबिक मालिका एक मोठा लक्षणीय टप्पा पार करत आहे. या मालिकेने तब्बल १७ वर्षे पूर्ण केली आहे, ज्यात ४४६० पेक्षा जास्त एपिसोड झाले आहेत, ज्यांनी लोकांना खूप हसवले आहे, जोडले आहे आणि आशा दिली आहे. नीला फिल्म प्रॉडक्शन्स च्या बॅनरखाली असित कुमार मोदी द्वारा निर्मित ही मालिका २००८ मध्ये सुरू झाली होती आणि आता सगळ्या पिढीतल्या प्रेक्षकांसाठी हे कौटुंबिक जिव्हाळ्याचे नाव बनले आहे.

# सोयगावात आवास योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ जुलै : येथील नगरपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना १ ते ४ हप्त्याच्या धनादेशाचे वाटप आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते करण्यात आले.शनिवार (दि.१९) रोजी सोयगाव येथे झालेल्या शेतकरी मेळावा कार्यक्रमात सदरील धनादेशाचे वितरण करण्यात आले.

घरकुल योजनेअंतर्गत घर बांधकाम पूर्ण झालेल्या २९ लाभार्थ्यांना १४ लाख ५० हजार तर ३८ लाभार्थ्यांना त्यांनी केलेल्या बांधकामानुसार ३२ लाख असे एकूण ६७ लाभार्थ्यांना ४६ लाख ५० हजार रुपयांचे धनादेश आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते वितरण करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपनगराध्यक्षा सुरेखाताई काळे,गटनेता अक्षय काळे,नगरपंचायत प्र.मुख्याधिकारी संभाजी देशमुख,नगरसेवक संतोष बोडखे,रऊफ शेख,हर्षल काळे,गजानन कुडके,लतिफ शहा,कृष्णा खेडकर,कदीर शहा,संदीप सुरडकर,किशोर मापारी,राजू दुतोंडे,नारायण घनघाव,भगवान जोहरे,विष्णू इंगळे तसेच नगरपंचायत कर्मचारी घरकुल लाभार्थी व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# भवन येथील उपसरपंचासह सदस्यांचे घंटागाडीला डीझेल व रत्यावरील ढाप्याच्या दुरुस्तीसाठी भिक मागो आंदोलन




सिल्लोड : ग्रामपंचायत भवन येथील सरपंच व ग्रामसेवक यांनी दोन महिन्यापासुन ठराव घेऊन सुद्धा गावात कचरा संकलन करण्यासाठी असलेल्या घंटागाडी व मारोती मंदिरा समोर टुटलेल्या ढाप्याची दुरुस्तीचे काम न केल्यामुळे अनेक लहान मुले त्या ढाप्यावरुन पडून जखमी झाले तसेच गटविकास अधिकारी यांनी स्वतः कचऱ्याची पाहणी करुन विविध पावसाळी आजाराची लक्षणे पाहता हि कामे तात्काळ करण्याच्या सुचना केल्या होत्या

परंतु ग्रामपंचायत कडे वरील कामाला पैसे नसल्याचे सरपंच व ग्रामसेवक यांनी सांगितल्याने भवनच्या उपसरपंच सौ भारती शिवाजी दाभाडे यांनी पुढाकार घेऊन गावात भिक मांगो आंदोलन करीत पैसे जमा केले जमा झालेली रक्कम हि ग्रामपंचायतला देण्यात येणार असुन आता तरी वरील कामे व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली

सदर आंदोलनाची भवन गावासह परिसरात चर्चा होत आहे यावेळी ग्रामपंचयत सदस्य सुलोचना खाजेकर , गणेश खैरे व माजी सदस्य शिवाजी दाभाडे यांची उपस्थिती होती

# प्राचीन नागघाटावर नागपंचमी उत्सव साजरा



तभा वृत्तसेवा

पैठण दि २९ :- पैठणच्या दक्षिण काशी तील प्राचीन शालीवाहन नगरीतील प्रसिद्ध नागघाटावर श्रावण शुद्ध पंचमी शुभापर्वावर रूढी, परंपरे नुसार नागपंचमी उत्सव साजरा करण्यासाठी पैठणकरांनी गर्दी केली होती. खेळण्याचे साहित्य खरेदी करण्यासाठी बालगोपालांची झुंबड उडाली होती. गोदावरी स्नान करून भक्तांनी भले पहाटे पासून नागघाटा वरील नागेश्वर दगडी मूर्तीचे दर्शन घेतले नागेश्वर नागदेवता मूर्तीचा पहिला अभिषेक करण्याचा मान प्रतीक यांना मिळाला पुरोहित जितेंद्र कुलकर्णी व जगदीश कुलकर्णी यांच्या मंत्रघोषात भक्तांनी नागेश्वर मूर्तीचा अभिषेक केला. नागघाटा वरील पेशवे गणपती, इंद्रेश्वर महादेव, नागेश्वर महादेव पिंडीचे व ज्ञानेश्वर महाराज मूर्तीचेही भक्तांनी दर्शन घेतले महिलांनी नागपंचमीची गीते म्हटली.

नागघाटावर भोपळ्या पासून तयार करण्यात आलेल्या पुंगी मधून स्वर काढून बालशालीवाहन व त्याचे कुंभारवाड्यातील सवंगडी नागांना डोलवायला लावायचे असे पैठण मधील जुनी मंडळी सांगते आता वर्तमान परिस्थितीत बांबू पासून तयार करण्यात आलेल्या बासरी आणि कागदी पिपानी पासून स्वर काढून मुले आनंद घेतात त्याच्या खरेदीसाठी नागपंचमी पर्वावर नाक घाटावर मुलांनी गर्दी केली होती. ऐतिहासिक नागघाटाचा विकास मराठवाडा विभागीय पर्यटन विभागाने विशेष लक्ष देऊन करावा, अशी मागणी नागघाट भक्त मंडळांनी केली आहे .

मामा चौकातील अनंत नाग मूर्तीची पूजा आर्ची भक्तांनी केली. वाहेगाव येथील नागनाथ मंदिरातही नागपंचमी उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

# नेतृत्व हे सेवेच्या आणि समर्पणाच्या पायावर विकसित होते - डी.जी. अश्विन बजोरिया



छत्रपती संभाजी नगर: लायन्स क्लब ३२३४क२ प्रांताचे नवनिर्वाचित डिस्ट्रिक्ट गव्हर्नर (डीजी) अश्विन बजोरिया यांचा पदग्रहण सोहळा अमेरिकेतील ओरलँडो येथे नुकताच संपन्न झाला. या सोहळ्यानंतर त्यांचे छत्रपती संभाजीनगर येथे शनिवारी (ता. २६) स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी आपले अनुभव शेअर केले आणि नेतृत्व विकासाविषयी प्रेरणादायी विचार व्यक्त केले.

डीजी अश्विन बजोरिया म्हणाले, नेतृत्व हे सेवेच्या आणि समर्पणाच्या पायावर विकसित होते. लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजसेवेची संधी मिळते, ज्यामुळे आपण स्वतःला आणि आपल्या नेतृत्वाला अधिक मजबूत करू शकतो. त्यांनी पुढे सांगितले की, नेतृत्व म्हणजे केवळ मार्गदर्शन करणे नव्हे, तर इतरांना प्रेरित करून त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल घडवणे आहे. त्यांनी लायन्स क्लबच्या सदस्यांना एकजुटीने समाजसेवेच्या कार्यात सहभागी होण्याचे आणि नव्या पिढीला नेतृत्वाची संधी देण्याचे आवाहन केले. या प्रसंगी अश्विन बजोरिया यांनी प्रांताच्या भविष्यातील योजनांवरही प्रकाश टाकला. त्यांनी शिक्षण, आरोग्य, आणि पर्यावरण संवर्धन या क्षेत्रांत विशेष लक्ष देण्याचे आश्वासन दिले.

लायन्स क्लब ३२३४क२ च्या या नव्या नेतृत्वाखाली प्रांतात समाजसेवेच्या कार्याला नवीन दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी रिजन चेअरपर्सन जयदीप घुगे, राधा तोरणेकर, झोन चेअरपर्सन महेंद्र खानापूरकर, आलोक अग्रवाल, अभिजीत हिरप, गजानन चव्हाण, सतीश देशपांडे, संगीता देशपांडे आणि अश्विनी जैस्वाल उपस्थित होते.

# देवगिरी बँक संचालक मंडळाचा कर्मचारी महासंघातर्फे सत्कार



छत्रपती संभाजीनगर - देवगिरी नागरी सहकारी बँकेला रिझर्व्ह बँकेने नुकतीच शेड्युल्ड बँक म्हणून मान्यता दिली असून, या ऐतिहासिक यशाच्या पार्श्वभूमीवर देवगिरी बँक कर्मचारी महासंघातर्फे बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संपूर्ण संचालक मंडळ यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमावेळी व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे, बँकेचे उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक प्रशांत देशपांडे, संचालिका जयश्रीताई किवळेकर, अमिता लेकुरवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे रुपेंद्र कोयाळकर यांची उपस्थिती होती.

या सोहळ्यात बँकेचे अध्यक्ष शितोळे यांनी बँकेच्या या उपलब्धी साठी कर्मचारी यांचा सहभाग अधोरेखित करत कर्मचाऱ्यांची बँकेप्रति असलेली निष्ठा आणि समर्पण याचा मोठा हातभार आहे असे सांगितले.

देवगिरी बँक कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी अध्यक्ष भरत म्हस्के, श्रीराम सांगळे, संदीप औटे,जीवन राजूरकर,किरण गंगावणे इ. उपस्थित होते. सर्व शाखा व्यवस्थापक आणि कर्मचारी यांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विविध गुणदर्शन कार्यक्रम. कर्मचाऱ्यांनी गाणी, वाद्यवादन अशा कलाप्रदर्शनातून आपले कौशल्य सादर करत वातावरण रंगतदार केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवगिरी बँक कर्मचारी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 512/2025

दिलीप त्रिंबक देवबोने व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी अर्जदार नं. ३ चे पती व अर्जदार नं. १, २ व ४ यांचे पिता नामे त्रिंबक कचरुजी देवबोने हे दि.१४/११/२०२४ रोजी मौजे कासोडा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले 'असुन अर्जदार नं. १. दिलीप त्रिंबक देवबोने, २. आकाश त्रिंबक देवबोने, ३. अनिता त्रिंबक देवबोने, अर्जदार नं. १ ते ३ रा.कासोडा ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर ४. जयश्री भ्र.अमोल शिंदे, रा.ईटावा, ता.गंगापुर जि.छ. संभाजीनगर यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२९/०७/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहिर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५०७/२०२५

यशोदाबाई कचरु आमराव व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी मयत कचरु पुंजाबा आमराव यांचा दि.०६/०१/२०२५ रोजी मौजे भागाठाण, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं.१. यशोदाबाई भ्र. कचरु आमराव, २. संतोष कचरु आमराव, ३. सुभाष कचरु आमराव, ४. शोभा भ्र.वसंतराव पठारे, रा.हमरापुर, ता. वैजापुर जि.औरंगाबाद ५. भारती भ्र.संजय आमराव, ६. विजय संजय आमराव, ७. राजेंद्र संजय आमराव, ८. प्रतिभा पिता संजय आमराव, अर्जदार नं. १ ते ३ आणि ५ ते ८ रा.भागाठाण, ता. गंगापुर जि.औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ८ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि २९/०७/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२५/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-२०
उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक ३०/०६/२०२५

अर्जदार : रंजना विजय राठोड रा. घुसूर तांडा ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय ता. कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या पतीचे मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा पती विजय शिवलाल राठोड चा जन्म दिनांक २३-०५-२०१८ रोजी घुसूर तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या पती चा मृत्यू दिनांक २३-०५-२०१८ रोजी घुसूर तांडा ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे, अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा पती विजय शिवलाल राठोड यांचा मृत्यू दिनांक २३-०५-२०१८ रोजी घुसूर तांडा ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ११-०८-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २३-०५-२०१८ रोजी घुसूर तांडा ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ...../०७/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. ए. कळमकर, ४ थे सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ५१४/२०२५ पुढील तारीख ०२/०९/२०२५

अर्जदार : १) मीना भ्र. नानासाहेब घिगे वय ५३ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. दायगांव पो. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) २) प्रवीन पिता नानासाहेब घिगे वय ३६ वर्षे, धंदा मजूरी रा. मु. दायगांव पो. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ३) प्रकाश पिता नानासाहेब घिगे वय ३५ वर्षे, धंदा मजूरी रा. मु. दायगांव पो. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ४) स्वाती भ्र. अमोल लंके वय ३३ वर्षे, धंदा घरकाम रा. पी.डी. जवळकर विद्यालय जवळ, गट नं. १७६, प्लॉट नं. ३३, मालानी नगर, सातारा परिसर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्र. २ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिण आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ४ यांचे वडील नामे नानासाहेब पुंजाबा घिगे हे दिनांक १५/०३/२०२५ रोजी मौजे दायगांव, पोस्ट लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासरे व अर्जदार क्रं. २ ते ४ यांची आजोबा नामे पुंजाबा बंडु घिगे हे दिनांक १३/१२/२००१ रोजी मौजे दायगांव, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ची सासू व अर्जदार २ ते ४ यांची आजी नामे कलाबाई पुंजाबा घिगे ह्या दिनांक २१/१२/२०१४ रोजी मौजे दायगांव, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेली असून मयत नानासाहेब पुंजाबा घिगे यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ मुले असून अर्जदार क्रं. ४ ही विवाहीत मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्रं. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत नानासाहेब पुंजाबा घिगे यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २९/०७/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापूर

## अग्रलेख...

# समस्येचे खरे मूळ

काँग्रेस ही गांधी-नेहरू घराण्याची खाजगी मालमत्ता आहे आणि या पक्षावर नेहमी या घराण्याचीच सत्ता चालेल असा गेल्या अनेक दशकांपासून दिला जाणारा स्पष्ट संकेत काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पक्षनिष्ठेचा मुलामा देऊन घराण्याची लाचारी करणाऱ्या ताटाखालच्या तमाम मांजरांना पुन्हा एकदा दिला आहे. या पक्षाने देशावर सत्ता गाजविली असा सर्वसामान्य जनतेचा समज असला, तरी खरी सत्ता या घराण्यानेच गाजविली हे काँग्रेसी निष्ठावंतांना चांगलेच ठावूक आहे. या पक्षाचा अध्यक्ष कोणीही असो किंवा काँग्रेसी सत्ताकाळात पंतप्रधान कोणीही असो, गांधी घराण्याचे वारसदार हेच या पक्षाचे सर्वेसर्वा आणि सत्तेचे संचालक असतात, हेही या निष्ठावंतांस ठावूक आहे. त्यामुळे, या घराण्याशी निष्ठा राखणे हीच राष्ट्रनिष्ठा मानून या घराण्याच्या वारसांचा प्रत्येक शब्द वेद मानण्याची मानसिकता पक्षात रुजली आहे. अन्यथा, तसे नसते तर गेल्या आठवड्यात राहुल गांधी यांनी केलेल्या एका वक्तव्यावर काँग्रेस पक्षात अंतर्गत प्रश्नचिन्हे निश्चितच उमटली असती. तसे न होता राहुल गांधींच्या त्या वक्तव्यानंतर पक्षनिष्ठेचा मुखवटा पांघरलेल्या ताटाखालच्या मांजरांची छाती अभिमानाने फुलून गेली, हे उभ्या देशाने अनुभवले ते चांगले झाले. राहुल गांधी हे पक्षाचे अन्य काही खासदारांपैकी एक खासदार आहेत. काँग्रेसकडे देशाची सत्ता होती त्या काळात ते पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते, अन्यथा त्यांच्याकडे पक्षाच्या किंवा देशाच्या सत्तेची कोणतीही मक्तेदारी कधीही नव्हती. आता तर ते सातत्याने पराभूत होत चाललेल्या आणि अनेक राज्यांतून पुरती वजाबाकी होत गेलेल्या एका पक्षाचे नेते आहेत. तरीही या देशाच्या राजकारणावर, समाजकारणावर आपली सरंजामशाही पकड शाबूत राहिली पाहिजे यासाठीचे त्यांचे प्रयत्न अनेकदा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्पष्ट दिसून आले आहेत. गेल्या आठवड्यात दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियमवरील ओबीसी न्याय संमेलनातील त्यांची ताजी वक्तव्ये हा त्या सरंजामशाही मानसिकतेचाच अस्सल पुरावा ठरतो. जातनिहाय जनगणना न करणे ही पक्षाची नव्हे तर व्यक्तिशः माझी चूक होती अशी कबुली त्यांनी या मेळाव्यात दिली, तेव्हा अपक्षेप्रमाणे काँग्रेसमधील गांधीनिष्ठ ताटाखालच्या मांजरांची छाती अभिमानाने फुलली असेलच, पण जे काम सत्ताकाळात पक्षाने करावयास हवे होते, ते न केल्याबद्दलच्या सरकारच्या जबाबदारीची मक्तेदारी स्वत:कडे घेऊन त्यांनी पुन्हा एकदा सत्तेपेक्षा वरचढ असल्याच्या आपल्या मानसिकतेचे प्रदर्शन कसे घडविले असा प्रश्न मात्र कोणासच पडला नसेल. जातनिहाय जनगणना करण्याची मागणी पंधरा वर्षांपूर्वी, २०१० मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी तत्त्वत: मान्य केली होती. सरकारची त्यासाठी तयारी असल्याचेही त्यांनी दर्शविले होते आणि तेव्हा विरोधक असलेल्या भारतीय जनता पार्टीने या मागणीस पाठिंबाही दिला होता. त्यामुळे जातनिहाय जनगणनेस भाजपा अनुकूल असतानाही, मनमोहन सिंह सरकारने या मुद्यावर पावले मागे का घेतली हा प्रश्न न पडता ताटाखालच्या निष्ठावंत मांजरांनी राहुल गांधी यांच्या कबुलीचा डांगोरा पिटावा ही आश्चर्याची बाब म्हणावी लागेल.

काँग्रेसच्या जातनिहाय जनगणनेच्या किंवा सामाजिक आरक्षणाबाबतच्या भूमिकेचा इतिहास संपूर्ण देशाला माहीत आहे. ओबीसी, दलित, मागासवर्गीय नेतृत्वाच्या संधी या पक्षात कशा डावलल्या गेल्या किंवा संधी दिल्यानंतर या वर्गातील नेतृत्वास कसे अपमानित केले गेले, याची उजळणी अनेकांनी वारंवार केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लोकसभा निवडणुकीत पराभूत करण्याच्या मोहिमेतील काँग्रेसी कारवायांचा इतिहासही अनेकदा उजेडात आणला गेला आहे. याच पक्षातील बाबू जगजीवन राम, सीताराम केसरी आदी नेत्यांच्या नेतृत्वास लगाम घालून सातत्याने गांधी घराण्याच्या छत्रछायेखाली वावरण्यात समाधान मानणाऱ्या निष्ठावंतांच्या इतिहासाचे पाढेही अनेकदा वाचले गेले आहेत आणि मनमोहन सिंह यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात सरकारचा अध्यादेश जाहीरपणे फाडून सरकारला माघार घेण्यास भाग पाडण्याचा राहुल गांधी यांचा वर्चस्ववादही देशाने अनुभवला आहे.

आरक्षण किंवा जातनिहाय जनगणना हे कोणा पक्षाच्या प्रमुखाच्या किंवा पक्षाच्या अखत्यारीतील निर्णय नसून सरकारने घ्यावयाचे निर्णय असतात. राहुल गांधी हे कधीच सरकारात नव्हते आणि त्यांच्या पक्षाचे सरकार असताना त्याबाबत कोणताच निर्णय घेतला गेला नव्हता. त्यामुळे, असे निर्णय घेण्याचे श्रेय किंवा न घेण्याची जबाबदारी थेट सरकारचीच असताना, स्वतःकडे घेण्याचा राहुल गांधींचा कांगावा पाहता, सत्तेवरील वर्चस्वाच्या सरंजामी मानसिकतेचा स्पष्ट संकेत त्यांनी दिला आहे, असेच म्हणावे लागेल. जातनिहाय जनगणना न करणे ही आपल्या २१ वर्षांच्या राजकीय कारकीर्दीतील चूक होती, अशी कबुली त्यांनी दिली असा मोठा कांगावा त्या दिवशी केला गेला. वस्तुत:, ज्या गोष्टीशी त्यांचा संबंधदेखील नव्हता, त्या गोष्टीची जबाबदारी आपली आहे असे भासविण्याचा व त्यातून पक्ष किंवा सत्तेवर आपली हुकूमत असल्याचा संकेत देण्याचा हा प्रयत्न हास्यास्पद ठरतो. उलट, असे न केल्याची जबाबदारी त्यांनी स्वत:कडे घेतली असेल, तर ज्या पक्षाने या सामाजिक प्रश्नाची उपेक्षा केली व त्यामुळे संबंधित समाजातील अनेकांस अनेक संधींपासून डावलले गेल्याने अन्याय सोसावा लागला, त्याचे प्रायश्चित्तही त्यांनी घ्यावयास हवे. याच दरम्यान राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अपमानजनक खिल्ली उडविण्याचा लाजिरवाणा प्रयत्न केला. पंतप्रधान मोदी ही देशापुढील समस्या नाही, असे उद्‌गार राहुल गांधी काढत होते, तेव्हा पंतप्रधान मोदी इंग्लंड, मालदीवसोबतच्या ऐतिहासिक कराराच्या प्रक्रियेत सहभागी झाले होते आणि उभे जग या राजनीतीकडे आदराने पाहात होते. पंतप्रधान मोदी यांच्यावर अवमानकारक टिप्पणी करून नियोजित पद्धतीने त्यास प्रसिद्धी मिळविण्याचा राहुल गांधी यांचा नवा राजकीय फंडा आता उघड झाला आहे. पण अशी टीका करून ते आपल्या देशाच्या विरोधी पक्षनेतेपदाची प्रतिष्ठा पणाला लावत आहोत, याचे भान विसरलेली ताटाखालची मांजरे मात्र, अशा टीकेवर टाळ्या पिटतात. मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआस सत्ता मिळाल्यापासून सातत्याने काँग्रेसची पीछेहाट होत आहे. अनेक राज्यांत आणि लोकसभा-राज्यसभेतही काँग्रेसच्या प्रतिनिधित्वास गळती लागली आहे. नरेंद्र मोदी ही देशापुढील समस्या नाही हे खरेच, पण गेल्या दहा-अकरा वर्षांपासून काँग्रेसपुढील समस्या मात्र ठरले आहेत. याच काळात मोदी यांच्या नेतृत्वास आव्हान देण्यासाठी राहुल गांधी यांना उभे करण्याचे काँग्रेसचे सर्व प्रयत्न फोल ठरले. सद्‌भावना यात्रेच्या निमित्ताने राहुल गांधी यांना देशभर पायपीट करावयास लावूनही काँग्रेस पक्ष आपली जनमानसातील प्रतिमा पुन्हा उभी करण्यात यशस्वी ठरला नाही. पंतप्रधान मोदी यांच्या प्रत्येक परदेश दौऱ्यात भारताची प्रतिमा आणि प्रतिष्ठा सातत्याने उंचावलेली पाहावयास मिळते. इंग्लंडसोबतचा ऐतिहासिक मुक्त व्यापार करार ही देशाच्या विदेश नीतीच्या इतिहासातील स्वागतार्ह घटना ठरली. मोदी यांच्या नेतृत्वाची खिल्ली उडविणाऱ्या राहुल गांधी यांच्या नावावर अशा कोणत्या ऐतिहासिक देशहिताच्या कामगिरीचा जमाखर्च मांडावयास गेले तर हाती काय लागेल याचे उत्तर निष्ठावंतांस देता येणार नाहीच. उलट, देशात महत्त्वाच्या, संवेदनशील घडामोडी घडत असताना, राहुल गांधी मात्र कोणताच सुगावा लागू न देता परदेश वाऱ्या करतात, तेव्हा त्याचे खुलासे करताना या निष्ठावंतांचीच दमछाक होते. तब्बल २१ वर्षांची राजकीय कारकीर्द असलेल्या राहुल गांधींना आता आपली चूक उमगली हे त्यांच्या कारकीर्दीचे मोठे अपयशही डांगोऱ्यासारखे पिटून त्यावर टाळ्या वाजविणाऱ्या निष्ठावंतांनी आता राहुल गांधींच्या कारकीर्दीतील अपयशांचा मागोवा घ्यावयास हवा. या नेत्याने देशाचे काय भले केले हा प्रश्न कदाचित सोडविता येणार नाही, पण पक्षाचे तरी काय भले केले, याचा लेखाजोखा मांडावयास हवा असे जेव्हा या निष्ठावंतांस वाटेल, तो पक्षाचा सुदिन ठरेल, यात शंकाच नाही.

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# चीनचा वॉटरबॉम्ब

चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी न्यिंगची शहरातील ब्रह्मपुत्रा नदीच्या खालच्या भागात आयोजित समारंभात धरणाच्या बांधकामाची सुरुवात करण्याची घोषणा केली. 'शिन्हुआ' वृत्तसंस्थेच्या म्हणण्यानुसार तिबेट स्वायत्त प्रदेशातील न्यिंगची येथील मेनलिंग जलविद्युत केंद्राच्या धरणाच्या ठिकाणी भूमिपूजन समारंभ पार पडला. न्यिंगची शहराला स्थानिक पातळीवर यारलुंग झांगबो म्हणून ओळखले जाते. या प्रकल्पावरील एकूण गुंतवणूक सुमारे १.२ ट्रिलियन युआन (सुमारे १६७.८ अब्ज अमेरिकन डॉलर्स) असल्याचा अंदाज आहे. या निमित्ताने ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वांत मोठे धरण बांधले जात आहे. चीन १४ लाख कोटी रुपये खर्च करून ब्रह्मपुत्रेवर धरण बांधत आहे. २०२३ च्या अहवालानुसार या जलविद्युत केंद्रातून दरवर्षी ३०० अब्ज किलोवॅट तासांपेक्षा जास्त वीज निर्माण होण्याची अपेक्षा आहे. ती ३० कोटींहून अधिक लोकांच्या वार्षिक गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी आहे. ती प्रामुख्याने बाह्य वापरासाठी वीज पुरवेल. तिबेटमधील स्थानिक मागणीदेखील त्यातून पूर्ण होईल. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. हे धरण हिमालयाच्या शिखरावर एका विशाल दरीत बांधले जाईल. जिथे ब्रह्मपुत्रा नदी एक मोठे वळण घेते आणि अरुणाचल प्रदेश आणि नंतर बांगलादेशमध्ये वाहते. याशिवाय चीनने तिबेटमधील सर्वांत मोठे जलविद्युत केंद्रदेखील चालवण्यास सुरुवात केली आहे. हा प्रकल्प २०१५ मध्ये सुरू झाला. ब्रह्मपुत्र नदी तिबेटमध्ये उगम पावते आणि भारत आणि बांगलादेशमधून वाहते. त्यावर धरण बांधून, चीन या खालच्या भागात पाण्याचा प्रवाह नियंत्रित करण्याची क्षमता मिळवू शकतो. त्याचा वापर भू-राजकीय शस्त्र म्हणूनदेखील केला जाऊ शकतो.

या प्रकल्पामुळे भारतात चिंता निर्माण झाली आहे. कारण ते वॉटर बॉम्ब सिद्ध होऊ शकते, जे पावसाळ्यात पूरपरिस्थिती वाढवू शकते किंवा दुष्काळात पाणी न सोडता अडवू शकते. सर्वप्रथम, या धरणाच्या खर्चाने अनेकांना आश्चर्यचकित केले आहे. अंदाजे १.२ ट्रिलियन युआन खर्च असल्याने हा पैशाचा योग्य वापर आहे का, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. याशिवाय नवीन धरण हिमालयीन तिबेटच्या भूकंपाच्या दृष्टीने सक्रिय प्रदेशात बांधले जात आहे. याचा अर्थ असा की, मोठे भूकंप झाल्यास आपत्तिजनक नुकसान टाळण्यासाठी बांधकाम पुरेसे मजबूत आणि स्थिर आहे, याची खात्री करण्यासाठी शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांना आणखी कठोर परिश्रम करावे लागतील. या प्रकल्पाशी संबंधित फारच कमी माहिती चीनने दिली आहे. त्यामुळे भारत आणि बांगलादेशसारख्या शेजारील देशांची चिंता वाढली आहे. चीनची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. यासोबतच, त्याची ऊर्जेची मागणीदेखील वाढत आहे. जलविद्युत हा एक स्वच्छ ऊर्जेचा महत्त्वाचा स्रोत आहे. त्यामुळे



कोळशावरील अवलंबित्व कमी होण्यास आणि कार्बन उत्सर्जन नियंत्रित करण्यास मदत होते. मोठी धरणे केवळ वीजनिर्मिती करत नाहीत, तर सिंचन आणि पूर नियंत्रणातदेखील मदत करतात. तिबेटसारख्या दुर्गम भागात अशा मेगा प्रकल्पांचे बांधकाम हा प्रादेशिक विकासाला चालना देण्याचा आणि या भागावरील चीनचे नियंत्रण मजबूत करण्याचा एक मार्ग आहे. अशा धरणांमुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह विस्कळीत होतो. त्यामुळे जलचरांच्या, विशेषतः माशांच्या स्थलांतरावर आणि प्रजननावर नकारात्मक परिणाम होतो.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे धरणांच्या मागे गाळ साचतो. त्यामुळे धरणाची क्षमता कमी होते आणि खालच्या भागात सुपीक गाळाचा प्रवाह थांबतो. तिबेटी पठार हा भूकंपाच्या दृष्टीने सक्रिय प्रदेश आहे. मोठ्या धरणांच्या बांधकामामुळे या प्रदेशात भूकंपाचा धोका वाढू शकतो. धरणांमुळे हवामानबदलाशी संबंधित अतिवृष्टी आणि पूर यासारख्या घटनांचा धोका वाढू शकतो. धरणांच्या बांधकामामुळे मोठ्या संख्येने स्थानिक लोकसंख्येचे विस्थापन होते. त्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होऊ शकते. स्पेन, फ्रान्स आणि स्वीडनसारखे युरोपमधील अनेक देश आपली जुनी धरणे वेगाने बंद करत आहेत. २०२३ पर्यंत १५ युरोपीय देशांनी ४८७ धरणे, अडथळे काढून टाकले. त्यांनी २०३० पर्यंत २५ हजार किलोमीटर नद्या अडथळामुक्त करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. धरणे नद्यांच्या नैसर्गिक परिसंस्थेला विस्कळीत करतात. ती काढून टाकल्याने नद्या मूळ स्वरूपात परत येतात आणि जलीय जैवविविधता पुनर्संचयित करण्यास मदत करतात. धरणे सॅल्मनसारख्या माशांचे स्थलांतर मार्ग रोखतात. त्याचा त्यांच्या प्रजननचक्रावर नकारात्मक परिणाम होतो. धरण काढून टाकल्याने मासे पुन्हा मुक्तपणे वर आणि खाली जाऊ शकतील. बंधारे काढून टाकल्याने गाळ पुन्हा नदीच्या नैसर्गिक प्रवाहासोबत जाऊ शकेल. ते खालच्या प्रवाहाच्या भागांसाठी महत्त्वाचे आहे. हवामानबदलामुळे अतिवृष्टी आणि पुराचा धोका वाढल्यामुळे अनेक जुन्या धरणांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता वाढली आहे. या धरणांची देखभाल करणे महाग आणि धोकादायक असू शकते.

आणखी एक दखलपात्र बाब म्हणजे काही जुनी धरणे आता पूर्वीइतकी फायदेशीर ठरत नाहीत आणि त्यांची देखभाल महागडी झाली आहे. अशा परिस्थितीत ती काढून टाकणे आर्थिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य बनते. युरोप या दृष्टीने समतोल साधत आहे. चीन आणि युरोपीय देशांच्या धरणांशी संबंधित धोरणांमधील हा विरोधाभास वेगवेगळ्या प्राधान्यक्रमांचे आणि विकासाच्या टप्प्यांचे वास्तव प्रतिबिंबित करतो. चीन अजूनही जलद आर्थिक वाढ आणि ऊर्जा सुरक्षेवर लक्ष केंद्रित करत असताना आणि त्यासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभारत असताना युरोपमधील देश त्यांच्या नद्यांच्या परिसंस्थेला झालेले नुकसान भरून काढण्याकडे आणि पर्यावरणीय शाश्वततेला प्राधान्य देण्याकडे वाटचाल करत आहेत. हे जागतिक स्तरावर मानवी विकास आणि पर्यावरण संरक्षण संतुलित करण्याचे आव्हान प्रतिबिंबित करते. चीनने मात्र अरुणाचल प्रदेशातील भारतीय सीमेजवळ तिबेटमधील ब्रह्मपुत्र नदीवर १६७.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या धरणाचे बांधकाम औपचारिकपणे सुरू केले. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली होती. हे धरण हिमालय पर्वतरांगांमधील एका विस्तीर्ण दरीत बांधले जाईल, जिथे ब्रह्मपुत्र नदी अरुणाचल प्रदेश आणि नंतर बांगलादेशमध्ये प्रवेश करण्यासाठी एक मोठा 'यू-टर्न' घेते. पूर्वीच्या अहवालांनुसार या प्रकल्पाचा आकार जगातील इतर कोणत्याही पायाभूत सुविधा प्रकल्पांपेक्षा खूप मोठा असेल. त्यात चीनच्या 'थ्री गॉर्जेस' धरणाचा समावेश आहे. तो जगातील सर्वांत मोठा मानला जातो.

चीनने २०१५ मध्ये तिबेटमधील सर्वांत मोठे १.५ अब्ज अमेरिकन डॉलर्स खर्चाचे 'जेम हायड्रो पॉवर स्टेशन' आधीच कार्यान्वित केले आहे. हा प्रकल्प हा केवळ पर्यावरण किंवा जलसुरक्षेचा प्रश्न नाही, तर अस्तित्वाला धोका आहे. या धरणामुळे सीमावर्ती आदिवासींचे जीवन, जमीन आणि संसाधने नष्ट होऊ शकतात. भारतासह बांगलादेशदेखील या प्रकल्पाला विरोध करत आहे, कारण दोन्ही देशांची शेती, पिण्याचे पाणी आणि परिसंस्था ब्रह्मपुत्रेतून येणाऱ्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. दोन्ही देशांचा विश्वास आहे की धरणामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा येईल, पोषक तत्त्वांनी समृद्ध गाळ येणे थांबेल आणि सर्वांत मोठी चिंता म्हणजे चीन नदीचे पाणी धोरणात्मक फायद्यासाठी वापरू शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# अवैध गुटखा विक्रीवर प्रतिबंध आवश्यक

राज्यात गुटखाबंदी असली तरी राज्याच्या कानाकोपऱ्यात गुटखा सर्रास विकला जात आहे. गुटखा तस्करांनी अवैधपणे मोठ्या प्रमाणात विक्री सुरू केली आहे. राज्यातील युवा पिढी मोठ्या प्रमाणात गुटख्याच्या आहारी जात होती. त्याचप्रमाणे गुटख्याच्या सेवनामुळे फुफ्फुस, तोंड उघडणे, मुख दुर्गंधी आणि आतड्यांच्या कर्करोगांचे वाढते प्रमाण विचारात घेऊन तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने २०१२ ला राज्यात गुटखाबंदी लागू केली होती. त्यासाठी राज्य शासनाने गुटख्यापासून मिळणाऱ्या वार्षिक १०० कोटी रुपयांच्या महसुलावरही पाणी सोडले होते. मात्र शासनाने ज्या उदात्त हेतूने गुटखाबंदी जारी केली होती त्यावर गुटखा तस्कारांनी केव्हाच पाणी फेरलेले दिसत आहे.

गुटखाबंदी लागू केली त्यावेळी राज्यात गुटखा उत्पादन करणारे ४० कारखाने होते. या उत्पादकांनी राज्य शासनाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते पण त्यांचे दावे टिकू शकले नाहीत. परिणामी काही गुटखा उत्पादकांनी आपले कारखाने मध्यप्रदेश, कर्नाटक, गुजरातसारख्या लगतच्या राज्यांमध्ये स्थलांतरित केले. या लगतच्या राज्यांमध्ये गुटखाबंदी नाही. त्यामुळे महाराष्ट्रात बंदी आदेश लागू केल्यापासूनच चोरट्या मार्गाने या राज्यातून गुटख्याची आवक सुरू झाली होती. जिल्ह्यांच्या सीमाभागात असणाऱ्या उत्पादन शुल्क, पोलिस आणि परिवहन विभागाच्या प्रतिबंधित नाक्यांवरील अधिकाऱ्यांचे हात ओले केले जात आहेत. राज्यात गुटख्याची पाच हजार कोटींवर उलाढाल पोहोचली आहे. राज्यात गुटखाबंदी असल्याने गुटखा कंपन्यांनी सुगंधी सुपारी आणि तंबाखू एकत्रच पण वेगवेगळ्या पॅकिंगमधून विकायला सुरुवात केली आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्र शासनाने अवैध गुटखा निर्मिती, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांना कायद्यानुसार जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करावी असा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविलेला आहे. दुसरीकडे २०१५ मध्ये शिवसेना-भाजपा युती सरकारने गुटखा तस्करी आणि विक्री हा अजामीनपात्र गुन्हा ठरविण्याचा निर्णय घेतला होता. पण या निर्णयाचीही कुठे अंमलबजावणी होताना दिसत नाही. परिणामी, या प्रकरणी कुणाला अटक झाली तरी तो लगेचच जामिनावर सुटून मोकळा होतो. राज्यात गुटखाबंदी जाहीर करताना तत्कालीन सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार १० टक्के शालेय विद्यार्थी, ४० टक्के महाविद्यालयीन विद्यार्थी गुटख्याचे सेवन करत होते. अलिकडील काही वर्षांत हे प्रमाण आणखी वाढल्याचे दिसत आहे. राज्यातील सरासरी २७ टक्के प्रौढ व्यक्ती गुटख्याचे सेवन करतात, अशी आरोग्य विभागाची आकडेवारी सांगते. विशेष म्हणजे त्यामध्ये काही प्रमाणात महिलांचाही समावेश आहे. खामगाव शहरातील सिव्हिल लाईन भागातील गरजेच्या वस्तू विक्रीच्या दुकानातून गुटखा विक्री करीत असल्याची गुप्त माहिती शहर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे शहर पोलिसांच्या गुन्हे शोधपथकाने पडताळणी केली. एकूण सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पथकाने बुलढाणा चिखली राज्य मार्गावर सापळा रचला. त्या कारवाईत तब्बल ६१ लाख रुपयांचा अवैध गुटखा साठा जप्त केला आहे स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत गुटख्याने भरलेला एक टाटा आयशर ट्रक पकडला. या वाहनाची तपासणी करण्यात आल्यावर त्यात गुटख्याचा मोठा साठा असल्याचे आढळून आले. गुटखा तस्करीचे मध्यप्रदेशापर्यंत धागेदोरे असल्याचे या कारवाईने पुन्हा सिद्ध झाले आहे. या घटनेतील आरोपी सईद खान रशीद खान हा देवास (मध्यप्रदेश) मधील रहिवासी आहे. वाशीम-अकोला जिल्ह्याच्या सीमेवरील मेडशी टी पॉईंटवर पावणे सात लाखांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. दुसरीकडे भारतात गांजावर पूर्णपणे बंदी आहे. तरीही लोक छुप्या पद्धतीने गांजाची लागवड करतात. तत्कालीन सरकारने १९८५ मध्ये गांजावर बंदी घातली. गेल्या अनेक वर्षांपासून देशात गांजावरील बंदी हटविण्याची मागणी होत आहे. काही भागांतील शेतकऱ्यांनी गांजाची लागवड करण्याची सरकारने परवानगी द्यावी अशी देखील मागणी केली आहे. बुलढाणा पोलिसांनी अमली पदार्थ विरोधात उघडलेल्या मोहिमेत लागोपाठ गांजाची शेती करणाऱ्यांवर कारवाई केल्याने हा जिल्हा गांजाचे भांडार म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. मोताळा, मलकापूर तालुक्यातील शेतात मोठ्या प्रमाणावर गांजाची लागवड व झाडे आढळून आली. पोलिसांनी आतापर्यंत अठरा लाख रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. लोणार तालुक्यात पोलिसांनी गांजाची शेती शोधून जवळपास दीड कोटी रुपयांचा गांजा जप्त केला होता. आता शासन, प्रशासनाने अवैध गुटखा विक्री व गांजाची शेती करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कंपनीतील कामाचे तास आणि कार्यसंस्कृती

कंपन्यांतर्गत कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या संदर्भात त्यांचे कामाचे तास व कंपनीतील कामाची पद्धत दर्शविणारी कार्यसंस्कृती हे मुद्दे बरेचदा व विविध संदर्भात चर्चेला येत असतात. कधी काळी कामाचे तास आणि वैयक्तिक-पारिवारिक जीवनात समन्वय आणि संतुलन साधणे व आपल्या कामापोटी कंपनीसाठी प्रदीर्घ तास आणि वेळ काम करण्याचा काळ गेल्या काही वर्षांत माघारी पडला आहे. याउलट आता कंपन्यांच्या अपेक्षेनुरूप कर्मचाऱ्यांनी कार्यालयातच नव्हे, तर घरूनसुद्धा अधिकाधिक काम करावे, अशी काही व्यवस्थापन-कंपन्यांची अपेक्षा दिसून येते. यामागे कर्मचऱ्यांना त्यांचे काम आणि त्यासाठीचे कामाचे तास याबाबत गृहीत धरण्यात आले असल्याची भावना विविध उद्योगांसह विशेषतः संगणक (आयटी) सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये बळावली आहे. कामाच्या व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाच्या तासांच्या संदर्भातील ही स्थिती व मानसिकता ही कंपन्या आणि कर्मचारी या उभयतांच्या संदर्भात आव्हानात्मक व चिंताजनक ठरली आहे.

सद्य:स्थितीत विशेषत: खाजगी क्षेत्रातील व त्यातही बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून मर्यादित वेळेत अमर्यादित स्वरूपातील कामाची अपेक्षा केली जाते. यात विशेषत: नवे वा नव्याने काम करणारे कर्मचारी अधिकच भरडले जातात. व्यवस्थापक व व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून खाजगी क्षेत्रात काम करणारा प्रत्येक जण व सर्वच कर्मचारी कायमस्वरूपी अस्थायी असतात. हे अलिखित तत्त्व अशा कर्मचाऱ्यांसाठी विशेष तापदायी ठरते.

वाढत्या व्यावसायिक स्पर्धेचे व त्यातून निर्माण होणाऱ्या ताणतणाव व नैराश्याचे लोण आता कंपनी व्यवस्थापन, व्यवस्थापक वा उच्च-पदस्थांपुरतेच मर्यादित न राहता, हे लोण आता सर्व स्तरांवरील व शेवटच्या टप्प्यातील कर्मचारी-कामगारांपर्यंत पोहोचले आहे, हे सद्य:स्थितीत एक कटु वास्तव ठरते. गेल्यावर्षी 'सीए'सारखे व्यवस्थापन क्षेत्र वा कायदा सल्लागार अथवा संगणकशास्त्र वा कॉल सेंटरमधील कर्मचारी असोत, यापैकी काही जणांनी कामाचे स्वरूप व त्यापोटी येणारा ताणतणाव यामुळे आत्महत्येचा मार्ग चोखाळला होता. कामासाठी धडपडणाऱ्यांकडून युवावस्थेत कामापोटी आत्महत्येसारखा आततायी व दु:खद मार्ग स्वीकारणे मोठे दु:खदायक ठरते.



यासंदर्भात 'राष्ट्रीय गुन्हेगारी नोंदणी' विभागातर्फे २०२२ सालचा तपशील व आकडेवारी यांच्याशी निगडित अहवाल सर्वांचेच डोळे उघडणारा ठरला आहे. या अहवालातील महत्त्वाचा व चिंतनीय भाग म्हणजे, २०२२ साली देशातील आत्महत्येच्या एकूण आकडेवारीतील दहा टक्के आत्महत्या करणारे हे पगारदार कर्मचारी-अधिकारी होते. अशाच प्रकारची माहिती अन्य संबंधित सर्वेक्षणांद्वारा वेळोवेळी समोर येतच असते. या जीवघेण्या प्रकाराशी संबंधित ज्वलंत मुद्दा म्हणून 'गॅलप'तर्फे जागतिक स्तरावरील कंपन्यामधील कामाचा प्रकार, कामाचे स्वरूप व कामकाज पद्धत यासंदर्भात नव्याने म्हणजे २०२४ साली केल्या गेलेल्या सर्वेक्षणाचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. 'गॅलप'च्या या जागतिक स्तरावरील कर्मचारी आणि त्यांचे काम यासंदर्भातील सर्वेक्षणानुसार आपल्यासाठी महत्त्वाची व तेवढीच चिंतनीय बाब म्हणजे, सद्य:स्थितीत भारतातील कर्मचाऱ्यांपैकी बहुसंख्य म्हणजेच तब्बल ८६ टक्के कर्मचारी हे आपले काम व कामाच्या ठिकाणी कामाच्या विलक्षण ताणतणावाखाली व संघर्षशील अवस्था व मानसिकतेत काम करीत आहेत.

आधी बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये असह्य काम आणि जीवघेणे कामाचे तास हा प्रकार व कामाची पद्धत आता भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रातच नव्हे, तर सेवा उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून आपल्याकडे सर्वदूर पसरली आहे. याला प्रामुख्याने पाश्चात्त्य व विदेशी कंपन्यांतर्फे भारतीय कंपन्यांतर्फे विशेषत: संगणकीय सेवा क्षेत्रात काम करवून घेणे, हे मोठे व महत्त्वाचे कारण ठरले आहे. मुख्य म्हणजे, या नव्या कामकाज पद्धतीला बँकिंग, विमा क्षेत्रांसह शासन व शासकीय विभाग पण आता अपवाद म्हणून उरले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. व्यवस्थापन तज्ज्ञ व कर्मचाऱ्यांचे कामकाज आणि त्यांची कामाच्या संदर्भातील व कामाच्या ठिकाणची मानसिकता यावर अभ्यास करणाऱ्यांच्या मते, कर्मचाऱ्यांच्या संदर्भात काम करताना ज्या प्रमुख गोष्टी त्यांना असह्य व यातनादायी होतात, त्यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी दुय्यम दर्जाची वागणूक मिळणे, त्यांच्या व त्यांच्याशी संबंधित कामकाज आणि कामाच्या पद्धतीत त्यांचा सहभाग नसणे वा त्यांच्याकडे दुर्लक्ष होणे, त्यांच्याकडून कायम दुय्यम दर्जाची वा प्रसंगी अनावश्यक वा अनैतिक कामे करवून घेणे, त्यांना कायम तणावग्रस्त स्थितीत काम करणे व त्यावर भर म्हणजे त्यांना अवमानजनक बोलणे, ऐकणे या आणि यासारख्या मुद्यांचा व परिस्थितीचा समावेश असतो. याच विषयाशी निगडित उत्तर अमेरिकेतील कंपन्यांचे मुख्याधिकारी व वित्तीय प्रमुखांमध्ये करण्यात आलेल्या विशेष सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट झालेली बाब म्हणजे, त्याठिकाणी सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ८० टक्के उच्चाधिकाऱ्यांनुसार, त्यांच्या कंपन्यांमधील कामकाज पद्धती व कार्यसंस्कृती कंपनी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाला पूरक नाही. आपल्याकडील 'गॅलप'द्वारा करण्यात आालेल्या व्यवस्थापकीय सर्वेक्षणामध्येसुद्धा नेमकी हीच बाब दिसून आली होती, ही बाब लक्षणीय आहे.

कर्मचाऱ्यांच्या स्थिर व सकारात्मक विचार आणि मानसिकतेच्या संदर्भात विशेष उपक्रम राबविणाऱ्या 'एचसीएल वेलनेस' कंपनीनुसार सद्य:स्थितीत व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी ३६ टक्के अधिकारी-व्यवस्थापक हे कामाच्या संदर्भात अति व अनावश्यक काळजी व त्याच्याच जोडीला कमी पातळीवरील कामाबद्दलचा गौरव या दोन्ही मुद्यांनी ग्रासलेले आहेत. हीच बाब कर्मचारी स्तरावर पण दिसून येते. मोठ्या संख्येत व काही ठिकाणी तर बहुसंख्य कर्मचारी हे त्यांचे काम, कामाचा प्रकार, कामाचे तास व एकूणच कामकाज म्हणजेच कार्यसंस्कृती यासंदर्भात त्रस्त झालेले असतात. यालाच जोड मिळते ती कंपनी-कर्मचाऱ्यांच्या दरम्यान असणाऱ्या ढासळत्या परस्पर विश्वास व समज आणि आपलेपणाची. कामाचे तास आणि कंपनीअंतर्गत कार्यसंस्कृती यामुळे कर्मचाऱ्यांचे सोडून जाण्याचे प्रमाण व टक्केवारी आजही सर्वाधिक असल्याचे नमूद करून 'गॅलप'ने त्यावर अभ्यासपूर्ण व जळजळीत प्रकाश टाकला आहे. एवढेच नव्हे अशा प्रकारे कंपनी व नोकरी सोडून जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागी नव्याची नेमणूक करताना व्यवस्थापनाला मोठा वेळ व आर्थिक भारही उचलावा लागतो, ही बाब साधार स्पष्ट केली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### 'त्या' लाडक्या भावांचे काय करणार?

निवडणुकीच्या काळात सत्ता काबीज करण्यासाठी प्रत्येक पक्ष काही ना काही आमिषे तसेच आश्वासन देत असतो. महाराष्ट्र सरकारने इतर राज्यातील अनुकरण करीत लाडकी बहीण योजना आणली. प्रत्येक बहिणीला १५०० रुपये प्रत्येक महिन्याला देऊ असे सांगितले. त्यानुसार अंमलबजावणी देखील झाली. मात्र या लाडक्या बहिणींमध्ये अनेक नियमांचे पालन करणे जमले नाही. जादा उत्पन्न असणारे, शासकीय नोकरदार महिलांनीही याचा लाभ घेतला. सगळ्यात धक्कादायक बाब म्हणजे केवळ महिलाच नव्हे तर पुरुषांनीही या लाडक्या बहिणींप्रमाणे लाभ घेतला असल्याचे उघड झाले आहे. यामध्ये सुमारे १४ हजार २९८ पुरुषांनी अंदाजे २१ कोटी ४४ लाख रुपयांचा लाभ घेतला असल्याचे उघडकीस आले आहे. अशा प्रकारे शासनाची फसवणूक करणाऱ्यांना काय शिक्षा देणार? दिलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल करावी. या लाडक्या बहिणींसाठी सरकार वर्षाकाठी जवळपास ४२ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. मग अशा लबाड, खोट्या पुरुषांना कडक शासन करून त्यांनी घेतलेले रुपये परत जमा करून घ्यावे.

**संतोष राऊत**/९९६०१०४३४५

●● ●●

### ज्ञानेश्वरी वाचनाने जीवनाला सुंदर वळण

आपल्या देशात विविध धार्मिक ग्रंथ आहेत. या ग्रंथांचे वाचन, मनन, चिंतन केल्याने व या ग्रंथातील सकारात्मक बाबी जीवनात उतरविल्याने जीवनातील विविध गुंतागुंतीचे प्रश्न व समस्यांची उकल सहज होते. भारतीय धार्मिक ग्रंथ हे मानवी जीवनाला योग्य व सकारात्मक ऊर्जा देणारे पवित्र व मंगल असे मार्गदर्शक आहेत. देशातील सर्वच धर्मांचे सर्वच ग्रंथ यातून मिळणारे सुंदर, सकारात्मक व निर्मळ जीवन जगण्याचे ज्ञान हे छान जीवन जगण्यासाठी अत्यंत उपयुक्त होय. या सर्वच धार्मिक ग्रंथांपैकी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मानवी जीवनाला सत्यम्, शिवम्, सुंदरम् वळण देणारा व जीवन जगण्याचे सुमार्ग दाखविणारा खरा मार्गदर्शक आहे. ज्या देशातील नागरिकांचे अंत:करण भक्तियुक्त, श्रद्धायुक्त व बुद्धियुक्त असते त्या देशातील प्रत्येक नागरिकाची कृती तेजस्वी, निकोप, निरोगी व निर्मळ असते. ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचनातून वरील तिन्ही प्रकारचे ज्ञान मिळून वाचकांचे अंत:करण शुद्ध व ज्ञानयुक्त बनते. यासाठी या भूतलावरील प्रत्येक व्यक्तीने ज्ञानेश्वरी अवश्य वाचावी व जीवन जगण्याचा आनंद घ्यावा.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### नागपंचमीचे धार्मिक महत्त्व

हिंदू धर्मामध्ये सर्प (नाग) हे देवतेच्या स्वरूपात पूजले जातात. नाग हे भगवान शिव आणि विष्णू या देवतांना अत्यंत प्रिय आहेत. भगवान शंकरांच्या गळ्यातील वासुकी नाग, तर भगवान विष्णू शेषनागावर विसावतात. यामुळे सर्पांना दिव्य स्थान प्राप्त झाले आहे. श्रावण महिना हा शिवपूजेसाठी महत्त्वाचा मानला जातो आणि नागपंचमीला सर्पांची पूजा करून शिव आणि विष्णू दोघांच्याही कृपाशीर्वादास पात्र होता येते.

या दिवशी नागदेवतेची पूजा केल्याने सापाबद्दलची भीती दूर होते आणि विषबाधेचे संकट टळते असे मानले जाते. ज्या व्यक्तींना कालसर्पदोष असतो त्यांनी नागपंचमीचे व्रत केल्यास त्यांचे दोष नाहीसे होतात. यमुना नदीतील कालिया नागाचा पराभव करून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित नदीच्या वर आले. तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. तेव्हापासून नागपंचमी हा सण साजरा केला जाऊ लागला. एकदा एक शेतकरी आपल्या शेतात नांगरणी करत होता. शेतकऱ्याचे नांगर चुकून एका नागिणीच्या बिळावरून गेले आणि नागिणीचे पिल्लं मरण पावली. रागाने त्या नागिणीने शेतकऱ्याच्या मुलाला दंश केला आणि तो मुलगा मरण पावला. त्यानंतर त्या शेतकऱ्याने नागदेवतेची मनोभावे पूजा केली आणि क्षमा मागितली तेव्हा त्या नागिणीचा कोप शांत झाला आणि शेतकऱ्याचा मुलगा परत जिवंत झाला.

नागपंचमी हा सण श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पंचमी या तिथीला येतो. बहुतेक स्त्रिया या दिवशी उपवास करतात. घरामध्ये नागदेवतेचा फोटो लावून त्याची पूजा केली जाते. काही ठिकाणी वारुळाची पूजा केली जाते, तसेच मंदिरात देखील पूजा केली जाते. नागदेवतेला धूप, दीप लावून पूजा केली जाते आणि दूध आणि लाह्यांचा नैवेद्य दिला जातो. नागपंचमीच्या दिवशी झोका खेळण्याची प्रथा आहे. सर्व महिला एकत्र येऊन झोका खेळतात. नागपंचमीच्या दिवशी जमिनीची नांगरणी करू नये. चाकू, सूरी, कोयता किंवा शेतात वापरली जाणारी अवजारे यांचा वापर करू नये. शेतकरी नागपंचमीच्या आदल्या दिवशीच जनावरांसाठी चारा कापून ठेवतो. तसेच महिलांनी देखील स्वयंपाकघरामध्य चाकू, सुरीचा वापर करू नये. या दिवशी तव्याचा वापर करू नये. त्यामुळे शिजवलेले पदार्थ आणि दूध लाह्या खातात. सर्पांना दूध पाजणे टाळावे, हे पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक आहे.

**प्रा. प्रशांत पंत**/मूर्तिजापूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पदोन्नतीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षकांचे जि प समोर उपोषण

## जिल्हा परिषद शिक्षक समन्वय समितीचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

शिक्षकांना उच्च श्रेणी मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, विस्तार अधिकाऱ्यांच्या रिक्तपदावर तातडीने समुपदेशनाने पदोन्नती द्यावी यासह इतर प्रलंबीत मागण्यांसाठी दि २९ जुलै रोजी जिल्हा परिषद शिक्षक समन्वय समितीच्यावतीने शिक्षकांनी लाक्षणिक उपोषण सुरू केले. या उपोषणाला मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षकांचे अनेक प्रश्न मागील काही वर्षापासून प्रलंबीत आहेत. अनेकवेळा मागणी करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याचे यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यामध्ये प्रामुख्याने पदोन्नती, निवडश्रेणीचा लाभ देणे दि १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहीरात असलेल्या कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन लागू करावी, विषय शिक्षकांना पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करावी, डीसीपीएस धारक शिक्षकांच्या कपातीच्या रकमेचा हिशोब तातडीने देण्यात यावा, मागील तीन वर्षापासून रखडलेले जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

या मागण्यांसाठी शिक्षक संघटनेच्यावतीने वेळोवेळी शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. मात्र प्रत्येक वेळी आश्वासनेच मिळाली. त्यामुळे शिक्षकांनी लाक्षणिक उपोषणाचा इशारा दिला होता. जिल्हा प्रशासनाने दि १७ मे रोजी लेखी पत्र देऊन या मागण्या तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले होते. परंतु लेखी आश्वासनानंतरही मागण्या सोडविण्यात आल्या नाहीत. त्यामुळे शिक्षक समन्वय समितीने मंगळवार दि २९ जुलै रोजी जिल्हा परिषदेसमोर लाक्षणिक उपोषण सुरू केले. यावेळी संघटनेचे हरिभाऊ मुटकुळे, आर बी जाधव, गजानन बोरकर, सुंभाष जिरवणकर, गजानन पेदे, विकास फटांगळे, सुनील गायकवाड, भालचंद्र आळणकर, सचिन देशमुख, रानोजी इंगळे, सुनील कदम, संतोष खंदारे यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी संघटनेच्यावतीने शिक्षकांच्या विविध २८ प्रश्नांची सोडवणुक करण्याचे निवेदन प्रशासनाकडे सादर करण्यात आले. या उपोषणाला शिक्षक नेते व्ही एस सुर्यवंशी यांनी भेट दिली. तसेच आंदोलनाला पाठींबा दिला.

या उपोषणाला भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनीही भेट देत शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. यावेळी सरचिटणीस उमेश नागरे यांची उपस्थिती होती. शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनीही भेट देत शिक्षकांच्या मागण्यासंदर्भात लवकरच निर्णय घेऊ यासाठी दर महिन्याला शिक्षकांच्या प्रश्नांवर बैठक आयोजित करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# युवकांनी भारत मातेच्या सेवेसाठी योगदान द्यावे- महेंद्रकुमार कांबळे

## कारगिल विजय दिनानिमित्त हुतात्म्यांना आदरांजली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

युवकांनी सैन्यात भरती होऊन भारत मातेच्या सेवेसाठी योगदान द्यावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.

कारगील विजय दिवस निमित्त शनिवार (ता. २६) रोजी अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे व उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शहिदांना अभिवादन केले, तसेच कारगील युद्धात ज्या सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, त्या सर्व सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करीत कारगील विजय दिवसानिमित्त हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना अपर जिल्हाधिकारी श्री. कांबळे म्हणाले, कारगील युद्धात ज्या सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या सर्व सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कारगिल दिवस साजरा करण्यात येत असल्याचे सांगून माजी सैनिकांच्या अडीअडचणी जाणून घेत त्या सोडवण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव तत्पर असल्याचे सांगितले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात हिंगोली जिल्ह्यातील माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सय्यद मीर, सुभेदार मेजर पुंडगे भीमराव, सुभेदार नामदेव मस्के, बाबूराव जांबुतकर, पंडित हाके, पुंडलिक महाराज, सुर्यकुमार बळखंडे यांच्यासह युद्ध वीर मरण आलेल्या सैनिकांच्या वीर नारी, वीर माता यांचा अपर जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा सैनिक कल्याण संघटक कॅप्टन मुकाडे, खराटे संघपाल, कडुजी टापरे, सिताराम फुपाटे यांच्यासह विविध विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी शहिदांना श्रद्धांजली वाहिली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# १५ ऑगस्टपर्यंत शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावा- घुगे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

जिल्हा परिषद शिक्षकांच्या स्थानिक पातळीवरील मागण्यांकडे शिक्षण विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्यावर आंदोलनाची वेळ आली आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने १५ ऑगस्टपूर्वी शिक्षकांच्या स्थानिक पातळीवरील मागण्या पूर्ण कराव्यात अशा सूचना भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांना दिल्या.



जिल्हा परिषद शिक्षकांच्या विविध प्रलंबीत मागण्यांसाठी मंगळवारी येथील जिल्हा परिषदेसमोर शिक्षक समन्वय समितीच्यावतीने लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला मोठ्या संख्येने शिक्षक-शिक्षिका तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. स्थानिक पातळीवरील प्रलंबीत मागण्यांसाठी वेळोवेळी शिक्षकांनी निवेदने दिली परंतु आजपर्यंत शिक्षण विभाग, वित्त विभागाने शिक्षकांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत. त्यामुळे उपोषणाचे हत्यार उपसावे लागले.

या उपोषणाला भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. गजाननराव घुगे, सरचिटणीस उमेश नागरे यांनी भेट दिली. यावेळी शिक्षकांशी संवाद साधल्यानंतर गजाननराव घुगे यांनी शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांना शिक्षकांच्या स्थानिक पातळीवर शिक्षकांना उपोषणाची वेळ का येते? असा सवाल करीत वित्त विभागाचे अधिकारी ऐकत नसतील तर आम्हाला सांगा, आमच्यासोबत त्यांची बैठक लावा, किंवा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक बोलवा आम्ही शिक्षकांचे प्रश्न मांडतो. १५ ऑगस्टपर्यंत शिक्षकांच्या स्थानिक पातळीवरील मागण्या न्य न केल्यास जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक लावू असा इशारा यावेळी गजानन घुगे यांनी दिला.



**हिंगोली- श्रावण महिन्यातील पहिला सण नागपंचमीनिमित्त तालुक्यातील खानापूर भागातील लहान मुलांमुलींनी झाडाला झोका बांधून झोके खेळण्याचा आनंद लुटला तसेच नागपंचमीनिमित्त ठिकठिकाणी महिलांनी नागनाथ मंदिरात पूजा करीत सण साजरा केला. छाया- लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोलीतील नर्मदेश्वर मंदिरात महाआरती



हिंगोली- शहरातील रिसाला नाका परिसरात असलेल्या रमेशचंद्र बगडीया यांच्या निवास असलेल्या श्री नर्मदेश्वर महादेव मंदिरात आज श्रावण सोमवार निमित्त संध्याकाळी पाच ते सात यावेळीत भजनसंध्या अंतर्गत भगवान महादेव यांच्यावर आधारित विविध धार्मिक भजन गीत गायले. त्यानंतर ७ : ३० वाजता महादेवाची महाआरती करण्यात आली. यावेळी रमेशचंद्र बगडीया, सुनिल बगडीया, आशुतोष बगडीया, कैलासचद्र बगडीया, योगेश व्यास, नरेश अग्रवाल, शुभम अग्रवाल, विजय बगडीया यांच्यासह मोठ्या संख्येनी महिला पुरूष भाविकभक्त उपस्थीत होते. भजनांनी परिसर भक्तीमय झाला होता. महाआरती नंतर आलेल्या भाविक भक्तांना साबुदाना खिचडी आणि दुधाचे वाटप करण्यात आले.

### वसमत आयटीआयमध्ये पदभरती

हिंगोली- वसमत येथील स्वातंत्र्य सेनानी गंगाप्रसाद अग्रवाल शासकीय प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये सोलार टेक्निशियन इलेक्ट्रिकल या नवीन ट्रेडच्या दोन युनिटला शासनाकडून मान्यता मिळालेली असल्याने या ट्रेडला सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश करावयाचे आहेत. त्यासाठी या ट्रेडसाठी तासिका तत्त्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता निदेशक नियुक्तीसाठी संस्थेमध्ये शनिवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२५ रोजी मुलाखतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या पदाच्या पात्रतेसाठी संकेतस्थळाला भेट द्यावी आणि परिसरातील सर्व पात्रताधारक उमेदवारांनी आपला बायोडाटा व अर्ज २ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत जमा करावेत. तसेच त्याच दिवशी पात्र पात्रताधारक इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस. एल. कोंडावार यांनी केले आहे.

### नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यामधील आजारसोंडा नालेगाव तपोवन व जवळा बाजार, पुरजळ या सर्कलमध्ये २६ जुलै रोजी मोठ्या प्रमाणा प्रमाणात पाऊस झाल्यामुळे पावसाचे पाणी हे शेत शिवारात वाहिल्याने सोयाबीन, कापूस, हळद, मुग, उडीद या पिकांमधून गेल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून महसूल विभागाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्याला आर्थिक मदत करावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष आदित्य आहेर यांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे. यावेळी पंढरी राखोंडे, बालाजी मगर वामन राखोडे, पांडुरंग ढोबळे आदींची उपस्थिती होती.

# केलेल्या कामांची जिओ टॅग छायाचित्र करा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०२४-२०२५ या वर्षात केलेल्या कामाचे काम करण्यापूर्वीचे व नंतरचे जीओटॅगची छायाचित्रे तसेच चालू वर्षाच्या कामाचे प्रस्ताव सादर करताना संबंधित कामाच्या ठिकाणाचे जीओटॅग छायाचित्रे गुरुवारपर्यंत उपलब्ध करुन द्यावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गीता गुठ्ठे तसेच सर्व विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत विविध विकास योजनांचे परिपूर्ण प्रस्ताव कामाची यादी व जीओ टॅग छायाचित्रांसह प्रशासकीय मान्यतेसाठी तात्काळ सादर करावेत. यासोबतच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील केलेल्या कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र, खर्चाचा ताळमेळ अहवाल देखील त्वरित पाठवावा. पायाभूत विकासाच्या योजनांसाठी एमआर सॅक यांच्याकडून सर्व निधीचे सेट क्रिएटीव्ह करण्यासाठी युनिक आयडी तयार करण्यात येत आहे. त्यासाठी सर्व यंत्रणांनी आपल्या कार्यालयाची माहिती एक्सेलशीटमध्ये तात्काळ सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले.

यावेळी महावितरण, पोलीस, जिल्हा परिषद, पशुसंवर्धन विभाग, कृषि विभाग, जिल्हा आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण, महिला व बालविकास विभाग, वन विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सार्वजनिक बांधकाम विभाग यासह विविध विभागांच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रशासनाच्या विविध विभागांना त्यांच्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

# बोगस मतदार नोंदणीस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करा- सोमय्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**



मतदार यादीत आढळलेल्या ५ हजार २१ बोगस मतदारांसहीत त्यांची नोंद घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी भाजपचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेकडे केली आहे.

सोमवारी भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या हे हिंगोलीत आले होते. यावेळी येथील जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांची जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासह प्रशासनातील अधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांची उपस्थिती होती.

यावेळी किरीट सोमय्या यांनी अधिकार नसतांना नायब तहसीलदार स्तराच्या अधिकाऱ्यांनी अनेक बोगस मतदार नोंदवून घेतल्याचे प्रकरण यापूर्वीच उघडकीस आले आहे. याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने केलेल्या पाहणी नंतर ५ हजार २१ मतदारांना बोलविण्यात आले होते. यापैकी एकही मतदार सुनावणीसाठी हजर झाला नाही. यावरून मतदारासहीत यांची नोंद घेणाऱ्या प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केली. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी नियमानुसार पुरावे दाखल करण्यासाठी शेवटची संधी देऊन त्यानंतर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

# कुस्तीगीर परिषदेच्या सरचिटणीसपदी प्रा. यादव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या तांत्रिक सरचिटणीसपदी प्रा डॉ बंकट यादव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आ. रोहीत पवार यांची महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी हिंगोली येथील प्रा बंकट यादव यांची कुस्तीगीर परिषदेच्या तांत्रिक सरचिटणीसपदी नुकतीच निवड केली आहे. त्यांच्या निवडीनंतर हिंगोलीत प्रा बंकट यादव यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी नगरसेवक बिरजू यादव व समाजबांधव दिसत आहेत. सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# शक्तीपीठ महामार्गात बदल करून डोंगरी भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जुलै**



डोंगरकडा-गिरगाव भागातून शक्तीपीठ मार्गाला विरोध होत असल्याने सदर महामार्ग वारंगा फाटा-येडशी-बोथी-सिंदगी-जांब-बोल्डा-पांगरा शिंद- लोहरा-संशानाईक तांडा-लक्ष्मणनाईक तांडा-दरेगाव-औंढा नागनाथ या परिसरातून करण्यात यावा. त्यामुळे या डोंगरी भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावेल आणि स्थलांतराचा प्रश्न मार्गी लागेल या मागणीचे निवेदन जिल्हधिकारी यांचेमार्फत शासनाला सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, समृध्दी महामार्गाप्रमाणे नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्ग प्रस्तावीत आहे. सदर महामार्ग हिंगोली जिल्ह्यातील डोंगरकडा-गिरगाव-वसमत या सधन भागातून प्रस्ताविक आहे. परंतु या भागात बारमाही पाण्याची सोय असल्यामुळे मुख्यत्वे केळी हे नगदी पीक घेतले जाते तसेच या भागातून अकोला-नांदेड, नागपूर-नांदेड महामार्ग गेलेला आहे. इतरही राज्यमार्ग या भागातून गेले आहेत. याउलट वारंगा फाटा-येडशी-बोथी-सिंदगी-जांब-बोल्डा-पांगरा शिंद- लोहरा-संशानाईकतांडा-लक्ष्मणनाईक तांडा-दरेगाव-औंढा नागनाथ हा डोंगरी भाग असून या भागात मुख्यत्वे आदिवासी, बंजारा समाज राहतो. या भागात रस्त्याचे जाळे कमी आहे. तसेच कोरडवाहू शेती आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होत असल्याने मुंबई पुणे या भागात कामाच्या शोधात स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे. या भागातून शक्तीपीठ महामार्ग गेल्यास येथील लोकांना रोजगाराच्या संधी मिळतील. स्थलांतराचे प्रमाण कमी होईल, जमीनीचे भाव कमी असल्याने शासनाला फायदा होईल, तसेच महामार्गासाठी लागणारी खनिज संपत्ती उपलब्ध होईल, या भागाचा विकास होईल. त्यामुळे शक्तीपीठ मार्ग या भागातून करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## निसर्गभान



# लिली फुलली

एक काय गं हा पाऊस! एकसारखी रिपरिप! सारंच ओलं - सगळीकडे चिखल! आला की थांबतच नाही अगदी!! माझी एक सखी पावसाला कंटाळून करवादली. मी माझ्या मनाशीच बोलले, किती रे वाट बघायला लावलीस यंदा? तहानलेल्या-आसुसल्या नजरेनं निळ्या निरभ्र नभाकडे बघत आषाढ संपत आला, पण तू लहान मुलासारखा फुरंगटून लपलेला. अन् मग पावसा, जांभळ्या-काळ्या ढगांमागे लपत तू आलास. प्रत्येक जीवाने मग विचारले,

**कालपरवापर्यंत कुठे होतास लपलेला?**
**शोधून तुला प्रत्येक जीव दमलेला**
**आता आलास हलक्या पावलांनी**
**शहारली पानं-फुलं तुझ्या स्पर्शानी**
**नाचतोयस टपटप माझ्या अंगणी**
**धरेनं झेललं न् कवेत घेतलं प्रेमानी**

पाऊस जगता यायला हवा. पावसाचं पाणी आकाशातून पडतं, धरेला भिजवतं, मनात झरतं आणि अंकुरते धरा-अंकुरतं मन.

खूप दुरवरून, समुद्राच्या लाटांवर स्वार होऊन, उंच पहाडांच्या रांगा लांघून, घनदाट जंगलामधून वाट शोधत तो येतो आणि मोत्यांचे दाणे पेरत सरीवर सरी बरसतात. त्याच्या मिठीसाठी आतुरलेली अधिर, तप्त वसुंधरा त्याला कवेत घेते अन् रोमारोमात भरून घेते. वसुंधरेच्या पोटी परत गर्भ अंकुरतो.

पावसाच्या सरींनी सध्या आसमंतात उत्साह भरलाय्. वसुंधरेच्या श्वासोच्छ्वासात भरलेला गंध प्रत्येक जीवाने स्वतःच्या श्वासात भरला आहे. झाडं-वेली अंगाखांद्यावरची धूळ झटकून ताजेतवाने झाले. आज पाऊस नव्हता. सकाळी बाहेर पडले, तर हवेच्या झुळकीसोबत डोलत आत्मानंदाचा अनुभव घेणाऱ्या गुलाबी, पांढऱ्या, पिवळ्या पावसाळी लिली उंच माना करून आणि आपापले भोंगे उघडून आजूबाजूला कुतुहलाने बघत होत्या. वृक्षलता, पशुपक्षी सगळ्यांनाच ऋतुचक्र कसे समजते? कोण त्यांच्या कानात कुजबुजत सांगते की, आता हा जो पाऊस आहे ना, हा अवेळीच बरसलेला वळवाचा पाऊस नाही. आता पावसाळा सुरू झाला आहे! मग लगेच लिलीची कंद तो ओलावा ओळखतात आणि प्रत्येक कंदातून निघालेल्या हिरव्या बारीक लांबसडक पानांमधून एक कळी डोकावते. भरभर दोन-तीन दिवसांतच त्या कळ्या वयात येतात आणि लगेच लिलीची नाजूक फुलं हिरव्या पानांत सुंदर नक्षीदार रांगोळी रेखतात.

**हिरवाईतून कशी आलीस विविध रंग लेवून?**
**जगण्याचा सजवते उत्सव आपली पुंगी वाजवून.**

वेगवेगळ्या मोहक लिली बगिच्याला देखणेपण देतात. लिलीची हिरवीगार पाने म्हणजे बगिचातले उत्साहाचे कारंजे! लिलीच्या कंदाजवळ ओलावा असला, तर ती पाने मलूल कधी दिसतच नाहीत. तशाच आणखी एक-दोन जरा वेगळ्या लिली दिसतात. एका पोकळ दांड्यावर लांब देठाच्या टोकाशी उमलणारी सहा नाजूक सडपातळ शुभ्र पाकळ्यांची आणि जांभळ्या परागांची सौंदर्यवती लिली आणि तिच्यासारखीच उमलणारी झिपरी लिली! बगिच्यात पांढरी मोठ्या भोंग्यासारखी दिसणारी लिली आहे. पाच-सहा दिवसांपासून तिची लांबसडक पानं वाऱ्यावर नाचत होती. मग त्यातून एक लांब पोकळ दांडा त्याच्या टोकाशी कळ्यांचे गाठोडे बांधून वरवर येऊ लागला. काल त्यातून बाहेर येऊन आठ गुबगुबीत शुभ्र कळ्या आठ बाजूंना बघत होत्या. आज सकाळी त्या सगळ्या उमलल्या. सहा लांबोळक्या शुभ्र पाकळ्या अन् प्रत्येक पाकळीच्या मध्ये एक जाडसर लाजरी गुलाबी रेघ! किती सुंदर रचना या फुलांची आणि हलकासा मंद सुगंध पसरविणारे गडद गुलाबी पराग! भोंग्या लिलीला इंग्रजीत ट्रंपेट लिली हे समर्पक नाव आहे. पावसाच्या सरी लिलीला ओलंचिंब करतात, तेव्हा प्रत्येक पाकळीवरचे ते मोत्याचे थेंब पाकळ्यांची घसरगुंडी करतात. पाकळीच्या टोकाशी पावसाच्या पाण्याच्या थेंबातून सूर्यकिरणं पाझरतात आणि त्या मोत्यांचे रत्न होते.

लहानपणापासून माहीत असलेल्या कंदापासून उगवणाऱ्या या विविध पावसाळी लिली! पण ओरिएंटल आणि एशियाटिक लिलीची फुलं दोनतीन दिवस टिकतात. यांच्यातही खूप प्रकार आहेत आणि वैज्ञानिक नवनवे प्रकार निर्माणही करताहेत. तिची पाच-सहा इंच व्यासाची मोहक, आकर्षक फुलं असतात. जगभरातील अनेक संस्कृती व साहित्यात या लिलीच्या फुलांना विशेष महत्त्व आहे. त्यांचा सौम्य सुगंध, पांढरा, पिवळा, केशरी, गुलाबी, लाल, जांभळा अशी रंगांची विविधता, मंद गंध आणि सहा पाकळ्यांची भोंग्यासारखी आकर्षक रचना बघणाऱ्याच्या मनाला साद घालते. जीवनातील शुभ्रतेचे, सौंदर्याचे आणि सकारात्मकतेचे प्रतीक असलेली लिली भगवंताची आठवण देते.

**वाटते रिमझिम सरीत न्हावे**
**अंगी फुलपाखरी डोळे असावे**
**फांदीवर बसून झोके घ्यावे**
**पानं कुजबुजती, ते ऐकावे**
**पुष्प-गंधाने श्वास दरवळावे**
**मनी भगवंत चरण स्मरावे.**

● **वृंदा जोगळेकर, नागपूर**
९४२२११३९४१

## गावगाडा

# गावाकडचा आठवडी बाजार

वनराईने वेढलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी या छोटाशा टूमदार गावात माझं बालपण गेलं. या वास्तव्यात गावातील अनेक आठवडी बाजार अनुभवले. आठवडी बाजाराच्या निमित्ताने आजूबाजूच्या खेड्यापाड्यातील अनेक लोकं बाजार करण्यासाठी आमच्या गावात यायचे. रविवार हा आमच्या गावचा बाजाराचा दिवस. या दिवशी सकाळीच आठवडी बाजारात दुकान लावण्यासाठी दुकानदारांची लगबग सुरू व्हायची. प्रत्येक गावात आठवडी बाजारासाठी विशेष जागा नेमून दिली जाते, तशीच जागा आमच्याही गावात होती. कालांतराने दुकानांची संख्या वाढल्याने दुकानांची रांग वस्तीत येऊ लागली. सणासुदीला तर हा बाजार आणखी फुलायचा.

इतर दिवसांच्या तुलनेत बाजाराच्या दिवशी गावातील किराणा दुकानात प्रचंड गर्दी असायची. गावाच्या पंचक्रोशीतील लोकांचा किराणा न्यायचा हा विशेष दिवस असायचा. मी कित्येकदा या किराणा दुकानासमोर उभा राहून लोकं काय काय घेतात, याचे निरीक्षण करायचो.

साखर, पत्ती, खाकस, जिरं, कलमी, भेंडी विलायची, तंबाखू पुडी, बिडी बंडल, खायचं तेल, डोकश्याचं तेल, मातीचं तेल अशी त्या स्थानिक बोली भाषेतील सामानाची यादी संपता संपत नव्हती. बरं ही संपूर्ण यादी कुठल्याही कागदावर उतरवलेली नसायची, तर मुखपाठ असायची. बाजार करून थकलेली ही लोकं मग श्रमपरिहार म्हणून किराणा दुकानात दुकानदाराकडून कच्चा चिवडा बनवून घ्यायचे. अनेकदा या बाजारात सोयरे-धायरे अनपेक्षित भेटायचे, मग बाजाराच्या या गर्दीतच त्यांच्या गप्पा रंगायच्या.

सुटीचा दिवस असल्याने आम्ही बच्चे कंपनी बाजार फिरायला जायचो. भाजीपाला, भांड्याची दुकाने, कटलरी, मसाल्याची दुकाने, कपड्याची दुकाने न्याहाळत शेवटी खाऊगल्लीत येऊन पोहोचायचो. शेवचिवडा, दाळवा, बेसनाची गनगडी, गोडी शेव पाहून तोंडाला पाणी सुटायचे.

त्या शेजारीच एका तंबूत चुलीवर गरमागरम जिलेबी काढली जायची. त्या जिलेबीची चव आजही जिभेवर रेंगाळतेय्. बरं, या बाजाराची स्पेशालिटी सांगायची झाल्यास, दैनंदिन गरजा भागवणाऱ्या सर्वच वस्तू येथे उपलब्ध व्हायच्या. अगदी सोनारसुद्धा आपली दागिन्यांची पेटी घेऊन या बाजारात बसत असे. पायातील चपला ते डोक्यातील टोपीपर्यंतच्या संपूर्ण गरजा हा आठवडी बाजार पूर्ण करायचा.

दोन-तीन थैल्यांचा बाजार झाला की, मग आपापल्या गावाकडे परतताना पुन्हा एकदा घेतलेल्या सामानाची उजळणी व्हायची. आता काही घ्यायचे राहिले नाही, हे ठरले की मग गावाकडचा रस्ता धरायचा.

हा केवळ बाजार नव्हता, तर त्यातून ग्रामीण जीवनपद्धती, खेड्यातील संस्कृती, लोकांचा आर्थिक स्तर अधोरेखित व्हायचा. आज छोटी छोटी गावे मोठ्या शहरांना जोडली गेली, दळणवळणाची साधने वाढली, रस्ते झाले, लोकांचा आर्थिक स्तरही वाढला. त्यामुळे आठवडी बाजारावर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या घटली. ऑनलाईन शॉपिंग कंपन्या ग्रामीण भागातही ऑनलाईन सेवा देऊ लागल्या. आजही गावात बाजार भरतो, पण या आधुनिकीकरणाच्या विळख्यात हा आठवडी बाजार कुठेतरी हरवलाय्. पूर्वीच्या बाजाराची मजा आजच्या बाजारात नाहीच.

● **अखिल देशपांडे, अकोला.**
९७६७१५१८३०

# "अजुन वाढा न जी..."

## मन्याच्या काड्या

जुनाट मंगल कार्यालय...अर्धवट गणवेश घातलेला बॅण्ड... "मेरा मेहबुब आया है..." अशा गाण्यावरही डिस्को स्टाईल नाचणारे वऱ्हाडी... घोड्यावर श्वास रोखून बसलेला नवरदेव... खांद्यावर उपरणे ठेवून "चला...लवकर करा... मुहूर्त जवळ येत आहे..." असे म्हणून घाई करणारा मुलाचा मामा आणि मुलीचा काका... हाती कलश, औक्षणाचे ताट घेऊन मस्त नऊवारी घातलेल्या भगीनी, काही अंगाने रामरोठ, तर काही बारीक, परकर पोलकं घातलेल्या आजूबाजूला काही चिमुरड्या...'इष्टमित्रांसह यावे' असे पत्रिकेत असल्यामुळे झाडून आलेले गावकरी... गर्दी म्हणावं तर सनान...नवरदेव घोड्यावरून उतरतो... औक्षण होते...जाड भिंगाच्या चष्म्यातून आतुरतेने वाट बघत असलेले गुरुजी...अक्षदा वाटणाऱ्या त्या काळच्या मुमताज, साधना, बबीता वगैरे... आणि नंतरचा विवाह सोहळा 'सावधान' म्हणताच पार पडतो.

यात मंगलाष्टके म्हणताना अनेक गायक-गायिका



आपसुकच तयार होत असे. अगदी मुठाळ काकुंचाही आवाज गोड वाटतो. फोटोग्राफरला या सर्व विधीचे काही सोयरसुतक नसे. तो कुठेतरी गळ्यात कॅमेरा लटकवून कोंट्यात उभा असतो...तेवढ्यात "रमेश कुठं गेला बे... बोलाव त्याले... फोटो काढाले बोलावलं का उभं रहाले..." एखादे काकाजी आदेश देतात अन कोणीतरी फोटोग्राफरला घेऊन येतो. लोकं लग्न लावायला मंचावर धडपडतात, पण फोटोवाला कोणालाच न थांबवता त्यातून गॅप शोधत असतो... शेवटी नवरा-नवरीच्या फोटोसोबत आजूबाजूला मोठाले चेहरे करून पोरीबाळी आजही जुन्या फोटोत तुम्हाला दिसतील. (...त्या काळचे सेल्फी), इकडे मुलीचे भाऊ, त्याचे मित्र, एखादा दुखावलेला मजनू हे सर्व हातात चिवडा-लाडूचे ताट घेऊन नवरदेवाच्या जानोस्याकडे जातात... एकाच ताटात दहा हात चिवड्यावर ताव मारतात. लाडूमध्ये काजू-किसमिस शोधणारे काही चिकित्सक पण असतात. भुका लागलेल्या असतात. ज्येष्ठ मंडळी "पानं घेतले का बघ रे बबन्या" असे म्हणत असतात. "बाप्पा...भाऊजी...काही मान-बिन आहे का नाई... बोलावल्याशिवाय पानावर कसं जायचं... कां जी वयनी..." अशा चर्चा सुरू असतात आणि मग मुलीचा मामा, भाऊ, वडील, आई, काका वगैरे जबाबदार मंडळी प्रत्येक खोलीत जाऊन "चला हो पंक्तीला" असे म्हणतात आणि मग मात्र जागा पकडायची कसरत सुरू होते. प्रत्येक जण हाताने एकमेकांसाठी जागा पकडतात आणि वाढणारे सक्रिय होतात.

छान पाटांची रांग, समोर ठेवलेलं 'कापसे बिछायत' लिहिलेलं ताट... बाजूला पेला, वाटी...वाढणारी एखादी चिमुरडी हातात मीठ, कोशिंबरी घेऊन उभी... तिला "हं... डावीकडे मीठ वाढायचं हं बने..." अशी सूचना देणारी एखादी नऊवारीतली काकू... मग कोहळ्याची भाजी... वांग्याची भाजी... पातळभाजी... गरम गरम पोळ्या... बाजूला कडक जिलेबी... एका बाजूला भजे... आणि मस्त मसालेदार अर्धा आलू सालासकट घातलेला मसाले भात... त्यावर साजूक तुप... सोबत ताक... तसेच कोशिंबीर, चटणी, निंबू असे पदार्थ एकाच चाळीत राहणाऱ्या कुटुंबासारखे पानात बरोबर एका बाजूला... अहाहा... अहाहा... मग खांद्यावर उपरणं घेतलेला कुणी ज्येष्ठ "वदनी कवळ घेता" म्हणतो आणि "सद्‌गुरुनाथ महाराज की जय" असे म्हणून वऱ्हाडी जेवायला भिडतात. मग आग्रह करणारे मुलीचे मामा, काका येतात आणि आग्रहाने वाढू लागतात. अशा किमान चार-पाच पंगती कोणीच "वाढू वाढू" थकत नाही आणि कोणीच "खाऊन खाऊन" दमत नाही. ही होती खरी जेवणाच्या पक्तीची मजा.एका मुलीला "वांग्याचा रस्सा' चिडवायचे, कारण कोण्या लग्नात ती वांग्याची भाजी वाढत होती आणि कोणीतरी रस्साच मागत होते. अशीही मजा रहायची. नाहीतर आज बघा... खिशात ठरलेली अमाऊंट लिफाफ्यात असते... पहिले राऊंड बफेच्या ठिकाणी होते. मेन्यू काय काय समजून घेतात. मग लग्न लावतात. कोणीच म्हणत नाही "जेवून जा बरं" तरीपण आम्ही 'दाबून' सर्व पदार्थ खातो. पानभर अन्न घेतो. मग आवडलं नाही, तर टाकून देतो. ती जड प्लेट हातात पकडणे, जेवणे व संवाद साधणे इतकी कसरत कमी की काय, मग हवा असलेला पदार्थ पुन्हा घेण्यासाठी रांगेत लागणे... खरी बिकट अवस्था होत ज्येष्ठांची...

शेवटी आईस्क्रीम खाल्ले की भुर्रकन घरी...पोट भरल्यासारखे वाटतच नाही. जेवणाची खरी मजा तर जुन्या काळच्या लग्नातच होती. विशाल कार्यालय नसले तरी मन विशाल होतं... थंडगार एसी नसला तरी मनाला 'थंडावा' देणारं होतं... फुलांचे डेकोरेशन नसले तरी संबंधाचा 'सुवास' होता... श्रीमंतीचा डोलारा नसला तरी 'संस्कृतीची श्रीमंती'' होती... अंगावर ढिगभर दागिणे नसले तरी लोकं 'मौल्यवान'' होते... पदार्थांचा फाफटपसारा नसला तरी 'मोजक्यात रुचकरपणा'' होता... चार-चार गोड पदार्थ नसले तरी "संस्काराचा गोडवा'' होता... आणि मुख्य म्हणजे, पंक्तीला वाढणारी, न थकणारी फळी होती आणि "अजी अजून वाढा न जी... असे म्हणणारे खवय्ये होते. 'जुने ते सोने'' उगाच नाही म्हणत...

● **मनोज वैद्य, नागपूर**
९८२२९४९२६०

## झुळूक

# उलट तपासणी

शिवराम चौधरी यांचे शेत हे देशमुख वकिलांच्या शेताला लागूनच होते. दोघेही प्रगतीशील शेतकरी असल्याने दोघांकडेही गुरेढोरे भरपूर प्रमाणात होती.

वकील साहेबांची वकिली चांगली जोरात आणि जोमात होती. जोडीला वडिलोपार्जित ओलिताचं वावर. त्यामुळे त्यांना सगळे वचकून राहत. शिवाय वकील साहेबांना आपल्या कायद्याच्या ज्ञानाचा खूपच गर्व होता. त्यामुळे ते शेजाऱ्यांशी जरा फटकूनच वागत असत. एकदा वकील साहेब आपल्या घरच्या कार्यालयात आरामात बसले असताना तिथे



चौधरीजी आले.

वकीलसाहेब, एक विचारायचं होतं!

बोला बोला, काय ते लवकर, मला वेळ नाही.

वकील साहेब, अहो, आज दुपारी आमच्या गुराढोरांनी तुमच्या शेतातील उभ्या पिकांची बरीच नासधूस केली, तेव्हा आता काय करावे? याबाबत तुमचा कायदा काय सांगतो?

वकील साहेब ताडकन उठून उभे राहिले आणि मोठ्या आवाजात हातवारे करीत म्हणाले... हे बघा चौधरीजी, माझ्या शेतात तुमच्या गुराढोरांमुळे झालेले नुकसान मी अजिबात खपवून घेणार नाही. कितीचे नुकसान झाले, त्याची पद्धतशीर मोजणी आणि मूल्यमापन करून मी ते तुमच्याकडून ताबडतोब वसूल करील. कारण, कायदा तसाच आहे आणि कायद्याप्रमाणे सर्वांना वागावेच लागते, हे लक्षात असू द्या. असं आहे काय? तर मग, वस्तुस्थिती आणि खरं काय ते ऐका वकील साहेब! खरी घटना अशी आहे की, प्रत्यक्षात तुमच्या गुराढोरांनी माझ्या शेतातील उभ्या पिकांची नासधूस केली आहे...मला कायदा काय ते जाणून घ्यायचे होते! झालेल्या नुकसानीचा तपशील मी लिहून आणला आहे... त्याचे बाजारभावाप्रमाणे योग्य मूल्यमापनही केले आहे. तेव्हा कायद्याप्रमाणे आता तुम्हाला ही नुकसान भरपाई देणे आहे. तुम्हीच आता कायद्याचा हवाला देऊन सिद्ध केले आहे. हवं तर तुम्ही घटनास्थळी शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करू शकता.

आता वकील साहेबांचा चेहरा गोरामोरा झाला. त्यांची बाजू त्यांच्यावरच उलटली होती. रोज कोर्टात आरोपी, फिर्यादी आणि साक्षीदारांच्या उलट तपासण्या घेणाऱ्या वकील साहेबांना आज स्वतःच्या शब्दात अडकावे लागले होते. देशमुख वकील आता खुर्चीवर ठीकठाक सावरून बसत म्हणाले, त्याचं असं आहे चौधरी साहेब, मी आता थोड्या वेळापूर्वी ढोबळमानाने बोललो बरं का! कायदा नेमका कसा आहे, याचा सूक्ष्म अभ्यास केल्याशिवाय मला आताच काही सांगता यायचे नाही! याबाबत बोलायला तुम्ही दोन-चार दिवसांनी या बघू! आणि कसंय ना, जीवनात सगळ्याच गोष्टीसाठी कायद्याची भाषा करणे योग्य नाही. काही गोष्टी या शेजार धर्माला अनुसरून पाळाव्या लागतात. जगात कमी जास्त होतच असते. प्रत्येक वेळी कायद्याचा आधार घेण्याची काय गरज? तुम्ही जरा शांत व्हा बघू!

● **मो. बा. देशपांडे, नागपूर**
८३२९१९३५४२

# जगी सर्व सुखी असा कोण आहे?

## स्पंदन

जगी सर्व सुखी असा कोण आहे, विचारी मना तुची शोधूनी पाहे... सुख पाहता जवापाडे दुःख पर्वता एवढे... ही संतवचने.

ईश्वर आणि मृत्यू या दोनच गोष्टी खऱ्या आहेत. ईश्वराजवळचा न्यायाचा तराजू फार अचूक असतो. आपल्याला सोसावी लागणारी दुःख त्याने सुखासुखी आपल्या माथी मारली नसतात. त्यामागे त्याने ठरवलेली निश्चित अशी कारण परंपरा असते. ज्याला सुख बघायचे आहे, त्याने दुःखसुद्धा पाहायला हवे. अगदी डोळे उघडे ठेवून. फक्त दोनच गोष्टी. ईश्वर आणि मृत्यू. पहिल्यावर विश्वास ठेवून दुसऱ्याकडे चालत निघायचे. गुडघे दुखत असले तरी सुद्धा. चालत होतास न? आता लंगडून बघ. सुख बघितलंस, आता दुःख बघ.. शेवटी काहीच खरे नाही,असे पु. भा. भावे लिहून गेलेत.

सुख आणि दुःख जीवनाचा स्थायीभाव असतो. सुख आणि दुःख एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात, ज्या एकमेकांना पूरक असतात. वाट्याला आलेले सुख आणि दुःख आपल्याच कर्माचे फळ असते. दुःख असते म्हणूनच सुखाचे महत्त्व लक्षात येत असते. ऊन आहे म्हणून सावली सुखावून जात असते. चढ आहे म्हणून उतार सुखावत असतो तसेच सुख-दुःखाचे असते. दुःखाचा दुस्वास करून चालण्यासारखे नसते. दुःख नको असेल, तर सुख पण नाकारावे लागत असते. सुख असो की दुःख, दोन्ही क्षण भांगूर असते. सुख आणि दुःख हातात हात घालून वाटचाल करीत असतात. दुःख जीवनाची खरी ओळख करून देत असते. जिसने दुःख नही देखा, वो सबसे बडा दुःखीयारा है, असे म्हटले जाते, ते उगीच नाही.

**गम हो कि खुशी दोनो**
**कुछ देर के साथी है फिर रस्ता ही रस्ता है**
**हसना है ना रोना है**
**दुनिया जिसे कहते है जादू का खिलोना है...**

असे लिहून गेलेले निदा फाजली अंतर्मुखच करून जातात. सुखाला विरुद्धार्थी शब्द दुःख असतो. पण, आनंदाला विरुद्धार्थी शब्द नसतो. सुख दुःखाच्या पलीकडे असलेल्या आनंदाच्या जगात निघून जायचे असेल, तर मग यथोचित ईश्वरी साधनेची कास ही धरावीच लागतं असते...

**अपनी ही करनि का फल है**
**नेकीया और रुसवायीया**
**आपके ही पीछे चलेगी आपकी परछायीया...**

..हा कर्मफल सिद्धांत कार्यरत असतो, याचे स्मरण असले की मग सुख असो वा दुःख, दोहोंचा साक्षी भावाने स्वीकार करणे कठीण जात नाही.

● **आशिष देव, चंद्रपूर**
७७४१८१८४१८

# श्रावण मनभावन

श्रावण महिना म्हणजे रोजच्या जीवनाचा कलह-अर्थशून्य वाटण्यापासून वाचवणारा, त्याचा सोहळा करणारा. ऋतूंचा राजा वसंत, तर महिन्यांचा राजा श्रावण. आषाढानं दिलेलं पाणी जमिनीत खोलवर मुरतं आणि त्याचा दृश्य परिणाम म्हणजे श्रावणातील सर्वत्र दिसणारं हिरवागार वातावरण. इथं झाडझुडपं आणि गवत आपल्या वैभवाचा आणि समृद्धीचा अनुभव घेत असतात, मनसोक्तपणे हवेत डोलत असतात. चराचरात आनंद ओसंडून वाहत असतो. म्हणून श्रावण म्हणजे समाधान आणि समृद्धी.

'श्रावणमासी हर्षमानसी हिरवळ दाटे चोहिकडे' किती योग्य वर्णन केलंय् बालकवींनी श्रावणाचं. एरवी रूक्ष वाटणाऱ्या डोंगरदऱ्या हिरव्या रंगानी फुलून गेल्या असतात. रंग तरी किती? गर्द हिरवा, शेवाळी हिरवा, चटणी हिरवा, पोपटी अशा हिरव्या रंगाच्या कितीतरी छटा बघायला मिळतात. त्यावर येणारी फुले ही पिवळी, निळी, जांभळी, गुलाबी, लाल, पांढरी अबोली, मन अगदी प्रसन्न होतं. श्रावणातला प्रत्येक दिवस महत्त्वाचा असतो; कारण श्रावण सर्व सृष्टीचे सौंदर्य ओंजळीत घेऊन येतो.

अशा श्रावणातल्या निसर्गाने ओंजळीत न मावेल इतके दिल्यावर ते उत्साहाने इतरांशी वाटून घ्यावं, हा संदेश देण्यासाठीच कदाचित श्रावणातील सण आणि व्रतवैकल्ये साजरी केली जात असावी. श्रावण अधिकच जवळचा वाटतो तो माहेरवाशिणीला. तिच्यासाठी आनंदाची पर्वणी असते. श्रावणात शिवपूजनाला अत्यंत महत्त्व आहे. श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी महादेवाच्या कृपेने पिंडीला १०८ बेलाची पाने वाहतात, शिवामूठ वाहिली जाते. श्रावण सोमवार म्हणजे एकवेळ उपास आणि शाळेला अर्धा दिवस सुटी. तिन्ही सांजेला उपास सोडायचा हे समीकरण आपोआपच रुजलं. जेवणात काहीतरी गोड पदार्थ असायचा, जसे केळाचे शिक्रण, सुधारस, करवंदाच्या गुळांबा यावर सगळी मंडळी खुश. श्रावणात पावसाळ्याचे दिवस असल्याने पचनशक्ती मंदावते आणि सतत गोडधोड खाल्ल्याने



पोटालाही आराम मिळावा, यासाठी ही एकवेळ भोजनाची व्यवस्था असावी.

श्रावणातला पहिला सण म्हणजे नागपंचमी. लहानपणी नागपंचमीच्या दोन दिवस आधीपासून गारुडी पुंगी वाजवून टोपल्यात नाग घेऊन फिरत असे. नाग हा शेताचे राखण करणारा म्हणून त्याला पूज्य मानून त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. लग्नानंतर पहिल्याच वर्षी नवविवाहित मुली मंगळागौर पूजतात. मंगळागौर म्हणजे अन्नपूर्णा धातूच्या मूर्तीची गौर मांडली जाते. शेजारी महादेवाची पिंड ठेवतात आणि त्याचे पूजन केले जाते. नववस्त्रांची रेलचेल, फुले, पाने यांचा सुकाळ यामुळे वातावरण पवित्र आणि आनंदी होते. मंगळागौर विविध खेळ खेळून जागवतात. हेच महत्त्वाचे ऊर्जा देणारे नाही काय? म्हणजे सग्या सोयऱ्यांचे गेट टूगेदर.

श्रावणातल्या शुक्रवारी जिवतीची पूजा करतात आणि सवाष्णीला जेवायला घालून पुरणा-वरणाचा नैवेद्य दाखविला जातो. संध्याकाळी गूळ फुटण्याचा प्रसाद दिल्या जातो. या पुजेमुळे घरात आरोग्य, धन लाभते असे म्हणतात. श्रावण शुद्ध सप्तमीला शीतळ सप्तमीही साजरी केली जाते तसेच रविवारी आदित्य पूजन केल्या जाते.

या महिन्यात राखी पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा खास भाऊ बहिणींचा दिवस. समुद्र किनारी असलेले लोक समुद्राची पूजा करून आपली कृतज्ञता व्यक्त करतात आणि नारळ अर्पण करतात. याच महिन्यात वद्य अष्टमीला श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी करतात. त्याच बरोबर दहीहंडी आणि गोपाळकाला दुसऱ्या दिवशी करतात.

त्यानंतर श्रावण अमावस्या येते. यालाच पिठोरी (दर्श) अमावस्या म्हणतात. परंपरेनुसार या दिवशी बैलांची पूजा करून बैलांना पुरणाचा नैवेद्य देतात. आई आपल्या मुलांना वाण देते. आई पीठाने तयार केलेले पक्वान्न तयार करते आणि ते डोळ्यासमोर नेऊन 'अतिथी कोण?' असा प्रश्न करते, तेव्हा त्या घरची मुले 'मी आहे' असं आपलं नाव सांगून पक्वान्न मागील बाजूने स्वतःकडे घेऊन येतात. यालाच मातृदिन असेही म्हणतात. ...असा हा श्रावण मास निसर्ग आणि मानवी मनावर अधिराज्य करणारा महान मास आहे.

● **स्नेहल खंडागळे, नागपूर** ९९७०१३७९७७

## खाद्य संस्कृती

# रानमेवा... निसर्गाचा ठेवा

उन्हाळ्याच्या उत्तरार्धात आणि पावसाळ्याच्या पूर्वाधात अनेक औषधीगुणयुक्त रानमेवा बाजारात दाखल होतो. आपल्या महाराष्ट्राच्या डोंगर रांगांमध्ये रानफळांचा खजिना दडलेला आहे. रानोमाळ मोकळ्या जागेत आणि कोणतीही लागवड, मशागत किंवा खास देखभाल न करता नैसर्गिकरीत्या उगवून वाढणाऱ्या वनस्पतींवरील विविध फळे आरोग्यदायी असतात. दऱ्याखोऱ्यांमध्ये राहणारे भटके, आदिवासीबांधव हा रानमेवा गोळा करून गावोगावी विकून त्यांच्या मिळकतीत भर टाकतात.

या बहुगुणी रानमेव्यातील करवंद (डोंगराची काळी मैना), जांभळे, बेदाणा, टेंभुर्णी (टेंभुरने), बिब्याची फुले (भीमफूल) ही फळे दरवर्षी लोकांचे विशेष आकर्षण ठरतात. पावसाळा आला म्हणजे रानमेवा मोठ्या ऐटीत बाजारात दाखल होतो. रान जांभूळ (डोंगराची काळी मैना) हे जंगली फळ आपल्या आंबट-गोड, तुरट अशा अनोख्या चवीने भुरळ घालत खाद्य शौकिनांच्या जिभेचे चोचले पुरवते.

पूर्वी सहज उपलब्ध असलेले रानमेव्यातील अनेक फळे आता दुर्मिळ होत चालले आहेत. त्यापैकी करवंदे रक्तवाहिन्यातील चरबीचे प्रमाण कमी करून रक्तपुरवठा सुरळीत करणे, रक्ताची कमतरता भरून काढून शरिराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास अत्यंत गुणकारी मानले जातात. करवंदाचे लोणचे, मुरब्बा, सरबत बनवून ठेवता येते. भरपूर प्रमाणात 'क' जीवनसत्त्व (व्हिटॅमिन सी) देणारे लाल गुलाबी हे फळ चवीला आंबट गोड असल्याने खट्टा-मीठा नावानेदेखील ओळखले जाते. पोटाचे विकार व त्वचा विकार कमी करणे, उष्णतेचे विकार कमी करून प्रतिकार शक्ती वाढवणे यासाठी करवंदे खाल्ले जातात. पिकलेली फळे शीतकारक व भूक वाढविणारी असतात.

टेंभुर्णी (टेंभुरने) : साधारण लिंबाएवढे असलेले हे नरम फळ साल काढून खावे लागते. याची साल हाताने निघते. आत लांबट बी निघते. यातील गर चिकट्सर असतो. टेंभुर्णी फळे तुरट व थंड असून, त्यांचा गर वात व मूत्रदाहावर गुणकारी मानल्या जातो. हे फळ पचन सुधारण्यास मदत करते.

बिब्याची फुले (भीमफूल) : पूर्वी आजीबाईच्या बटव्यात भीमफुलांना मानाचे स्थान होते. तुरट आणि रुचकर असणारे हे फळ पिकल्यानंतरच खाल्ले जाते. आयुर्वेदात बिब्बा फळांपासून अनेक औषधी बनविल्या जातात. बिब्यापासून काळे बिबे, बिबाफुल, गोडंबी व बीबा तेल असे वेगवेगळे पदार्थ तयार केले जातात.

जंगलातील जैवविविधतेचे प्रतिनिधित्व करणारा बहुगुणी रानमेवा म्हणजेच सर्वांना हवाहवासा वाटणारा चवदार खाऊ... बाजारात विकायला आला की खरेदी करायला अबालवृद्धांची एकच झुंबड उडते.

● **पंकज पाटील, मलकापूर, जि. बुलढाणा** ९८५०४३०५७९

● संयोजक ● **संजय रामगिरवार,** ९८८१७१७८३२

# शाळेमध्ये घुसून गुंडगिरी करणारे अटक

## बीड शहर पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**

दिनांक २३/०७/२०२५ रोजी सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या आवारात शाळेतील दोन मुलांच्या एकमेकांमधील किरकोळ भांडणाचे कारणामुळे पाथरूड गल्लीतील काही मुलांनी शाळेमध्ये घुसून मुलास आणि मुलाच्या पालकाला मारहाण केली होती. बीड शहर पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून १५ आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून घेतला होता. सीसीटीव्ही फुटेज वरून सर्व आरोपी निष्पन्न झाले आहे.

या १५ आरोपी पैकी आठ प्रमुख आरोपी यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. गुन्हा दाखल केल्या पासून काही आरोपी फरार होते. त्यातील चार आरोपी हे अल्पवयीन असल्याने त्यांना पालकांच्या ताब्यात दिली आहे.

अटक झालेल्या आरोपींची नावे खालील प्रमाणे आहेत.. १. अनेश नरेश गायकवाड वय २५ वर्ष, २ साहिल नरेश गायकवाड व २१ वर्ष, ३. शेखर रत्नाकर जाधव वय ३१ वर्ष, आकाश पालकर जाधव वय ३९ वर्ष. सर्व राहणार पात्रुड गल्ली अशी आहेत. यातील दोघेजण हे अभिलेखावरील गुन्हेगार आहे आणि त्यांच्यावर अगोदरच मारहाणीची गुन्हे दाखल आहेत.



अशा गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांनी सांगितले आहे.अशा घटना पुन्हा होऊ नये यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी आरोपी अटकेबाबत सविस्तर सूचना दिल्या होत्या. सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे बीड शहरचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोउपनि महेश जाधव, पो.ह. संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, बापू गायकवाड यांनी केली आहे.

# सौ.के.एस.के महाविद्यालयात संपूर्ण आरोग्य तपासणी व आयुर्वेदिक उपचार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि हेल्थ सेंटर यांच्या वतीने युनिकेअर हेल्थ सेंटर,ठाणे यांच्या वतीने महाविद्यालयातील कर्मचार्यांची संपूर्ण तपासणी करण्यात आली. त्यात मधुमेह,रक्तदाब, नाडी परिक्षण,डॉक्टर सल्ला, वैयक्तीक आहार सल्ला,योगा मार्गदर्शन,बीएमआय, प्रकृती निदान, संपूर्ण बॉडी ॲनालिसीसव ब्लड टेस्ट करण्यात आले.

दिनांक २८ जुलै रोजी सकाळी ११.०० वा.आयोजित संपूर्ण आरोग्य तपासणी व आयुर्वेद उपचार शिबीराचे



उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते व डॉ.सुनिल महाजन युनिक केअर हेल्थ सेंटर,ठाणे यांच्या उपस्थितीत शिबीरास सुरूवात होऊन त्यात महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून विविध प्रकारचे उपचार व सल्ला घेण्यात आला.या वेळी आरोग्यसल्लागार करून कौशिक सुर्वे,प्रथमेश नारकर, तृप्ती आसकर, हर्षल भालेराव, दिपाली परब यांनी उपस्थित शिबीरार्थींना मार्गदर्शन केले.यावेळी प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.यादव घोडके तर आभार प्रदर्शन डॉ.व्ही.एस.फटाले यांनी केले.

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात नागपंचमी सण उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.२९ जुलै**

नागपंचमी हा श्रावण महिन्यातील एक महत्वाचा सण आहे. या दिवशी नागाची पूजा केली जाते. नागदेवतेला प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांच्या आशीर्वादासाठी हा सण साजरा केला जातो.

कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयांमध्ये नागपंचमी निमित्त विद्यार्थ्यांनी हाताने तयार केलेले कागदी, कापडी व मातीच्या सापाचे प्रदर्शन व पूजन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी, विभाग प्रमुख श्रीम.रागिणीताई जोशी व मारुती झाटे व्यासपीठावर उपस्थित होते.मान्यवरांच्या शुभहस्ते



विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सापाचे पूजन यावेळी करण्यात आले.

पूजनानंतर विद्यार्थ्यांनी मनसोक्त असे भारतीय परंपरेतील नृत्य सादर करून आनंद व्यक्त केला.नागपंचमी सणाच्या औचित्यने विद्यालयांमध्ये झोका बांधण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी झोका खेळून मनसोक्त आनंद घेतला. या कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी सापाचे धार्मिक महत्त्व देत कृष्ण व कालिया मर्दान कथा व साप हा शेतकऱ्याचा मित्र आहे. अशी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. यावेळी विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन अनिल चव्हाण तर आभार प्रदर्शन सुनील कुंभार यांनी केले. कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने करण्यात आली.

# परळी तालुका भाजपा ग्रामीण (पूर्व )कार्यकारिणी व विविध आघाडयांचे अध्यक्ष जाहीर

## सहा उपाध्यक्ष, दोन सरचिटणीस तर पाच चिटणीस आणि एक कोषाध्यक्ष यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२९ जुलै**

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या आदेशानुसार आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या सूचनेवरून भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी कार्यकारिणी जाहीर केली आहे. जुन्या-नव्यांना प्राधान्य देत सर्व घटकांना जोडणारी ही कार्य कारिणी असुन सहा उपाध्यक्ष, दोन सरचिटणीस तर पाच चिटणीसांची निवड करण्यात आली आहे. विविध आघाड्यांचे अध्यक्षही यावेळी घोषित करण्यात आले.

भाजपा तालुका अध्यक्ष पदी राजेश गित्ते यांची काही दिवसांपूर्वीच निवड झाली आहे. त्यानंतर उर्वरित कार्यकारणीकडे सर्वांचे लक्ष लागले असतानाच आज राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे व माजी खा. डॉ. प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या आदेशानुसार आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या सूचनेवरून भाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी परळी तालुका ग्रामीण( पूर्व )कार्यकारिणी जाहीर केली असुन त्यात उपाध्यक्ष म्हणुन सौ शिवकन्या ताई बाळासाहेब फड, संजय मुंडे, भरत सोनवणे, सूर्यकांत मुंडे, सौ अश्विनीताई शिवाजी कुकर, सुंदर मुंडे यांची निवड करण्यात आली आहे. सरचिटणीस रवी कांदे आणि प्रा बीभीषण फड यांची वर्णी लागली आहे. चिटणीसपदी किशोर गित्ते, अनिल गुट्टे, धनराज गित्ते, नवनाथ मुंडे, अनंत दहिफळे तर कोषाध्यक्षपदी भुराज बदने यांची नियुक्ती केली आहे.

भाजपाच्या विविध आघाडीचे अध्यक्षही जाहीर करण्यात आले असून महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी सौ अंजलीताई नवनाथ मुंडे, युवा मोर्चाच्या तालुका अध्यक्ष पदी मोहन होळंबे यांची अल्पसंख्याक मोर्चाच्या अध्यक्षपदी खाजा मेहबूब पठाण यांची दलित आघाडीच्या अध्यक्षपदी धुराजी साबळे तर ओबीसी मोर्चाच्या अध्यक्षपदी प्रल्हाद शिंदे अनिसूचित जमाती मोर्चा अध्यक्ष पदी महादेव कंदूकटले यांची निवड करण्यात आली आहे.नव्या जुन्यांना संधी देत आणि सर्व सामाजिक घटकांना कार्यकारणी मध्ये प्राधान्य देत ताई साहेबांच्या आदेशानुसार तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी सर्वव्यापक आणि सर्वांना न्याय देणारी कार्यकारणी जाहीर केली असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे.

ना.पंकजाताई मुंडेंनी साधले सोशल इंजिनिअरिंग

परळी वैजनाथ तालुका भाजपाची कार्यकारिणी निवडताना मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांनी सोशल इंजिनिअरिंग साधले आहे. कार्यकारणी मध्ये विविध समाज घटकातील आणि विविध स्तरातील सर्वसामान्य, एकनिष्ठ कार्यकर्त्यांना संधी देत, अनोखा योग साधला आहे. या नवीन कार्यकारणी मध्ये सर्वच घटकांना समान संधी दिल्याचे दिसून येत आहे. यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.





# बालरंगभूमी परिषदेचा शिवरायांच्या गौरवशाली इतिहासावर आधारित ‘इतिहास महाराष्ट्राचा’ उपक्रम

**बीडमध्ये १२ ऑगस्टला प्राथमिक फेरी; अंतिम फेरी मुंबईत २३ व २४ ऑगस्टला**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**

छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास लहान मुलांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने बालरंगभूमी परिषदेने ‘इतिहास महाराष्ट्राचा’ हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत शिवजन्मोत्सव ते शिवराज्याभिषेक या कालखंडातील महत्त्वाच्या घटनांचे सादरीकरण नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला आणि इतर कला प्रकारांद्वारे करण्यात येणार आहे. या उपक्रमाची प्राथमिक फेरी बीडमध्ये दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी होणार असून अंतिम फेरी २३ व २४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत पार पडणार आहे. ही माहिती बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, बीड जिल्हाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर आणि प्रमुख कार्यवाह योगेश शुक्ल यांनी दिली.

# लोककलेची परंपरा जोपासणाऱ्या टिपरे महोत्सवासाठी गेवराई सज्ज



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२९ जुलै**

गेवराई शहराला टिपरे आणि सोंग या लोककलेची सुमारे शंभर वर्षाची परंपरा लाभली आहे. या लोककलेची परंपरा जोपासण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातुन दरवर्षी नागपंचमीच्या निमित्ताने भव्य टिपरे महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी बुधवार दि. ३० जुलै रोजी सायं. ६ वा. बाजार तळ, गेवराई येथे टिपरे महोत्सवाचे आयोजन केले असुन या निमित्ताने होणार्या स्पर्धांमध्ये सहभागी होवुन टिपरे महोत्सव यशस्वी करण्याची आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे खर्या अर्थाने या लोककलेला राजाश्रय मिळाला आहे.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त सप्ताह आयोजन





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या २७ व्या पुण्यमारणार्थी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह आयोजन ह.भ.प. शांतीब्रम्ह गुरुवर्य श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी आरंभ होणार आहे.

दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी दीप प्रज्वलन ह.भ.प. महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड, ह.भ.प गोपाळ म. शास्त्री पोखरी, ह.भ.प उद्धव म. चोले खडकी, कलश पूजन ह.भ.प महादेव महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी, ह.भ.प महादेव महाराज राऊत जवळा, ह.भ.प. भागवत म. पुरी श्री क्षेत्र पंचमुखेश्वर भाटेपुरी, गुरूची प्रतिमा पूजन: ह.भ.प शांतीब्रम्ह माठाधिपती नवनाथ बाबा महाराज, गाथा पूजन, ज्ञानेश्वरी पूजन, टाक पूजन, विना पूजन, मृदुंग पूजन, हार्मोनियम पूजन हे होईल. या नंतर फुल टाकण्याचा कार्यक्रम होऊन व्यासपीठ पूजन होईल. अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होईल. दि. ०२ऑगस्ट शनिवार रोजी रात्री ०९ ते ११वा. या वेळेत ह.भ.प समाजप्रबोधनकार निवृत्ती म. इंदोरीकर यांचे कीर्तन दि. ०३ ऑगस्ट रविवार रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज सांगळे यांचे कीर्तन, दि ०४ ऑगस्ट सोमवार रोजी ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे, ०५ ऑगस्ट मंगळवार सचिन महाराज ढोले, दि ०६ऑगस्ट बुधवार ह.भ.प. विशाल महाराज खोले, दि. ०७ ऑगस्ट गुरुवार रोजी ह.भ.प.जगन्नाथ महाराज पाटील, दि.०८ ऑगस्ट शुक्रवार रोजी ह.भ.प.विश्वनाथ महाराज वारिंगे कोकणरत्न यांचे कीर्तन सेवा होणार आहे. दि. ०९ ऑगस्ट शनिवार रोजी १२ ते ०२ वा. ह.भ.प. संजयजी महाराज पाचपोर, रामायणाचार्य बुलढाणा विदर्भ यांचे काल्याचे कीर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

# आरोग्य विभागाला खा.सोनवणेंकडून ‘इंजेक्शन’ कर्मचाऱ्यांचे वेतन होणार वेळेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांचे समायोजन व वेतन विहित वेळेत होत नसल्याबाबत अनेक तक्रारी खा.बजरंग सोनवणे यांच्याकडे आल्या होत्या. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने खा.सोनवणे यांनी आरोग्य विभागाला तातडीने प्रश्न सोडवण्याबाबत पत्र दिल्यानंतर आरोग्य संचालक यांनी जून अखेरपर्यंत वेतन आदा करण्याचे आदेश दिले आहेत.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत बीड जिल्ह्यतील उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच प्रशासकीय स्तरावर विविध स्तरावर संवर्गनिहाय अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचे वेतन वेळेत होत नसून दोन तिन महिन्यांचे वेतन झाले नसल्याच्या तक्रारी खा.सोनवणेंकडे आल्या होत्या. त्यांनी तातडीने आरोग्य विभागाला पत्र देवून प्रश्न सोडवावे, असे म्हटले होते. यानंतर आरोग्य संचालक यांनी पत्र काढले असून यात म्हटले आहे, दि.१४ मार्च २०२४ शासन निर्णयानुसार समायोजन व विहीत वेळेत वेतन देणेबाबत राष्ट्रीय आरोग्य अभियान, अधिकारी व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य, शाखा बीड यांच्याकडून विनंती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्षेपेक्षा व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या अधिकारी/कर्मचारी बाबतची कार्यवाही सदयस्थितीत शासनस्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे राज्य कार्यालयातील वित्त विभागाकडून मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा नुसार जिल्हा, परिमंडळ, महानगरपालिका व इतर सर्व आरोग्य संस्था यांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी निधी वितरीत करण्यात येतो. सदर वितरीत निधी मधुन राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे मानधन त्या- त्या स्तरावर अदा करण्यात येते तथापि, केंद्र शासनाकडून निधीची तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे जिल्हयांना निधी वितरीत करण्यात आला नाही, त्यामुळे कार्यरत अधिकारी/कर्मचा-यांचे मागील २-३ महिन्यांचे मानधन प्रलंबित होते. या कार्यालयाच्या दि.१५ जुलै २०२५ रोजीच्या पत्रान्वये जुन, २०२५ अखेरपर्यंतच्या प्रलंबित मानधनाकरिता या कार्यालयातील वि: विभागामार्फत जिल्हा, परिमंडळ, महानगरपालिका, प्रशिक्षण केंद्र व इतर सर्व संबंधित कार्यालयाना वित्तीय मर्यादा वितरीत करण्यात आली आहे. तसेच सदर वितरीत करण्यात आलेली वित्तीय मर्यादा ही केवळ प्रलंबित मानधनासाठीच खर्च करणे अनिवार्य असल्याबाबत्त सुचना संबंधितांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत, असे म्हटले आहे.

# सौ.के.एस.के कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी च्या विद्यार्थ्यांचे प्रथम दिनी गुलाब पुष्पाने स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जुलै**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील ऑनलाईन पध्दतीने प्रवेशित झालेल्या प्रथम,द्रितीय,तृतीय फेरीतील विद्यार्थ्यांच्या तासिका दिनांक २८ जुलै २०२५ पासून सुरू करण्यात आलेल्या आहेत. या प्रथम दिवशी महाविद्यालयातील कला,विज्ञान व वाणिज्य शाखेतील इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य ,उपप्राचार्य,कमवि उपप्राचार्य, पर्यवेक्षक व शिक्षक यांनी प्रत्येक विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# आम्ही युतीधर्म पाळु, भाजपला खुमखुमी असल्यास स्वबळावर लढावे : हेमंत पाटील



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२९ जुलै -**

आम्ही युती धर्म पाळू जर भारतीय जनता पार्टी ला खुमखुमी असल्यास त्यांनी आगामी निवडणुका स्वबळावर लढवाव्यात आम्ही तयार आहोत असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे उपनेते हेमंत पाटील यांनी युतितील मित्र पक्षांना दिला. सिडको येथे झालेल्या शिवसेना शिंदे गटाच्या बैठकीत बोलत होते.

सिडको येथे पार पडलेल्या आगामी मनपा व जिल्हा परिषद निवडणुका संदर्भात शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व इच्छुक शिवसैनिक यांची बैठक सिडको येथील धूत कॉम्प्लेक्स येथे पार पडली यावेळी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवू त्यासाठी शिवसैनिकांनी जोमाने कामाला लागले पाहिजे असे मत व्यक्त केले. आत्ताच्या निवडणुका सोप्या राहिलेल्या नाहीत त्या खर्चिक झाल्या आहेत असा इशारा इच्छुक शिवसैनिकांना दिला. याचवेळी शिवसेनेचे उपनेते हेमंत पाटील यांनी निवडणुकीबाबत पदाधिकारी व शिवसेनेने आगामी निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागले पाहिजे यापूर्वी या ठिकाणी सेनेचे चार चार नगरसेवक होते तेव्हा सिडको हडको शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जात होता. यापुढेही आपण हा बालेकिल्ला राखून ठेवायचा आहे असे सांगितले. आगामी निवडणुकीत आम्ही युतीधर्म पाळू जर भाजपला खुमखुमी असेल तर त्यांनी स्वबळावर आगामी निवडणुका लढवाव्यात त्यासाठी आम्ही तयार आहोत . शिवसेना काय आहे हे आम्ही मागील निवडणुकीमध्ये दाखवून दिले आहे. यापेक्षा वेगळे काही युतीतील मित्र पक्षांना सांगायची गरज नाही. असे या बैठकीत सांगण्यात आले. यावेळी या बैठकीस मंचावर आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, विनय गिरडे, सुहास खराणे, राजेंद्र कुलथे, बाळासाहेब देशमुख, स्मिता कुलकर्णी, गजानन राजुरवार हे होते. तर या बैठकीस शिवसैनिक व पदाधिकारी कृष्णा पांचाळ, पप्पू गायकवाड, पिंटू महाराज, सुदिन बागल, सतीश खैरे, संजय लहानकर, राजू टमन्ना, पंडित गजभारे, रावसाहेब तारू, आनंद सरोदे, रवी थोरात यांच्यासह शेकडो शिवसैनिकाची उपस्थिती होती.

# तीन वर्षांपूर्वी घडलेल्या बनावट घटनेतून लाच लुचपत विभागाकडून सरकारतर्फे गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ जुलै -**

सन २०२१ साली भोकर फाटा येथील एका खाजगी फायनान्स कडून फार्मा कंपनीचे ट्रॅक्टर घेऊन त्या कर्जाची वेळेला परत फेड झाली नसल्याच्या कारणावरून खाजगी फायनान्स कडून वाहन जप्त केल्याने अंतर्गत वाद झाल्याने पोलीसात तक्रार करण्यात आली. शेवटी मूळ रक्कम वापस करून आपसी तडजोड झाल्याने प्रकरण बंद झाले. ट्रॅक्टर कंपनी सुद्धा बंद झाली. या घटनेस तीन वर्षाचा कालावधी झाल्यानंतर या प्रकरणात थेट लाच लुचपत विभागाने संशयास्पद रित्या सरकारतर्फे गुन्हा दाखल केल्याने सर्वत्र वेगळ्या चर्चेला उधाण आले आहे.

महामार्ग पोलीस चौकी वसमत फाटा परभणी येथील प्रताप खुराणा व अन्य रा. परभणी यांनी चार वर्षांपूर्वी फार्मा कंपनीचे ट्रॅक्टरची शो रूम उघडून अनेक शेतकऱ्यांना खाजगी फायनान्स कडून ट्रॅक्टर विक्री केले होते. कालंतराने ही कंपनी सुद्धा आपला गाशा गुंडाळून गेली. या घटनेस साधारण तीन साडे तीन वर्ष झाली. दरम्यान येथून शेख अजीज शेख जब्बार यांनी सुद्धा खाजगी फायनान्स कडून ट्रॅक्टर घेतले होते. मधल्या काळात वेळेत कर्जाची परतफेड झाली नसल्याने फायनान्स कडून त्याचे ट्रॅक्टर कंपनी मध्ये थकीत रक्कम साठी जप्त करण्याची कार्यवाही केली गेली होती. वास्तविक ही घटना कुठे घडली, कोणत्या ठिकाण वरून ट्रॅक्टर नेले, याचा ठाव ठिकाण नाही. मूळ मालक हे लोहा तालुक्यातील आहे. सध्या आज रोजी देगलूर नाका भागात राहतात. कंपनीचे वास्तव्य हे अर्धापूर हद्दीत येते. घटना कुठे घडली याचा कुठेही पुरावा नाही असे असताना अर्जदाराने २०२२ मध्ये ग्रामीण पोलीस ठाणे नांदेड येथे मालक प्रताप खुराणा यांच्या विरोधात अर्ज दिला होता. माझे ट्रॅक्टर प्रताप खुराणा यांनी माझी संमती किंवा मला न कळवता परस्पर ट्रॅक्टर जमा केले. थकीत कर्ज न भरल्याने खाजगी कंपनी कार्यवाही करु शकते हि बाब त्याने सांगितले नव्हती. सदर अर्जाची तत्कालीन अधिकारी यांनी चौकशी केली. दोघात तडजोड झाल्याने त्यांचा अर्ज २०२२ मध्ये निकाली काढण्यात आला होता. या घटनेला तीन वर्ष पूर्ण झाली. या काळात चौकशी अधिकारी बदलले इन्चार्ज अधिकारी बदलले असताना सुद्धा अर्जदाराने माझे ट्रॅक्टर चोरी गेल्याची तक्रार ही पोलीस ठाण्यात न देता पोलीस अधीक्षक नांदेड यांना दिली होती. त्यानुसार सदर अर्ज चौकशी कामी पोलीस ठाणे ग्रामीण यांना गेल्यावर यात चौकशी करून त्याचा अहवाल हा वरिष्ठ अधिकारी यांना जाणे किंवा अर्ज निकाली काढणे हा पर्याय असतो त्यानुसार

## खाजगी फायनान्स कर्ज प्रकरण

या घटनेत अगोदरच चौकशी व कार्यवाही करण्यात आली असल्याने हा अर्ज निकाली काढण्यात आला हे विशेष!

असे असताना जाणीवपूर्वक कोणाला तरी टार्गेट करण्यासाठी मूळ अर्जदारांनी गुन्हा दाखल करण्यासाठी पैसे मागणी केल्याची तक्रार नांदेड लाच लुचपतकडे केली होती. त्यानुसार लाच लुचपत विभागाने मूळ अर्ज, फिर्याद संबधित ठाण्यात दिला आहे किंवा नाही हे न बघता वरिष्ठ अर्जावर गुन्हा दाखल करता येतो किंवा नाही हे फिर्याद घेण्यापूर्वी तपासून घेणे कर्तव्य असताना त्यांनी टार्गेट पूर्ण करण्याच्या उद्देशने तक्रारदार यांची फिर्याद घेतली हे विशेष. त्यानंतर सुद्धा लाचलुचपतने मागणी १२ हजार रुपये असताना पडताळणी मध्ये १ लाख मागणी केल्याचा उल्लेख केला ही दुसरी चूक केली का घडवून आणली हा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यानंतर सुद्धा आरोपी लोकसेवक यांना पैसे घेताना सापळा लावला तेंव्हा १० हजारच्या रक्कमेला ऐथरासिन हे पावडर लावून सापळा लावला. यात पण मागणी रक्कम १२ हजार, पडताळणी मध्ये १ लाख रुपये तर सापळा लावताना दहा हजार या संशयस्पद बाबी दिसून येत आहेत. घटनेला अजून कलाटणी म्हणजे फिर्यादीला प्रकरण अंगलट येते किंवा आपण हे चूक करतो लक्षात आल्यावर त्याने स्वतः वकील मार्फत फिर्याद वापस घेतली. एवढेच नव्हे तर त्याने शपथपत्राद्वारे सुद्धा लेखी देऊन तक्रार वापस घेत असल्याचे पत्र दिले होते.

दरम्यान सोमवारी झालेली ही कारवाई पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत संघर्षातुन, राजकारणातुन झाली असल्याची चर्चा देखील ऐकावयास मिळत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### बितनाळ जि प केंद्रिय प्राथमिक शाळेत शालेय गणेश वाटप

**उमरी -** उमरी तालुक्यातील शैक्षणिक गुणत्तेसह सामाजिक उपक्रमात नामांकित असलेली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बितनाळ येथे शालेय गणवेश वाटप करण्यात आले.दि. २३ जुलै रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बितनाळ येथे शालेय विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रमाणे मोफत गणवेश , बूट , सॉक्स वाटप करण्यात आले आहे. शालेय गणवेश ची निवड शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य , सरपंच , उपसरपंच गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या सर्वानुमते चांगल्या दर्जाचे शालेय गणवेश ठरविण्यात आला . गणवेश वाटप शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नागनाथ घुमलवाड, सरपंच प्रतिनिधी मोरोती पाटील उमाटे, माजी सरपंच प्र मारोती वाघमारे ,उपसरपंच प्र देविदास आक्कमवाड, मा. सरपंच प्रतिनिधी , संकल्प कोचींग क्लासेस चे शिक्षक मारोती घुमलवाड ,शा व्य समिती सदस्य सुदाम सूर्यवंशी, गावातील प्रतिष्ठित नागरिक बालाजी सूर्यवंशी , राजू डूबुकवाड , गावातील प्रतिष्ठित पत्रकार गणेशराव आनेमवाड , पत्रकार साहेबराव तुरेराव ,केंद्रीय मुख्याध्यापक भगवान संपतवार व सर्व शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. केंद्रीय मुख्याध्यापक भगवान संपतवार गावातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व शिक्षक घोगरे यु एस , वडमीले एल के , सौ कल्याणकर एम बी , सौ तांबरे आर जी , पेंडलवार एस पी , शिवणखेडकर एस जी , मोटर वार व्ही बी , कळसकर के एन यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देवून स्वागत करण्यात आले आहे .

### विविध सामाजिक उपक्रम राबवून पंकजा मुंडे यांचा वाढदिवस साजरा

**किनवट**-राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपिनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा जिल्हा सरचिटणीस संदीप केंद्रे यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. मराठवाड्यातील नामांकित बोधडी येथील अंध विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, फळे व बिस्किटांचे वाटप करून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्यात आले. तसेच, विविध ठिकाणी शुभेच्छा फलक लावून पंकजाताईंना अभिवादन करण्यात आले. किनवट शहरातील माजी नगराध्यक्ष अरुण आळने कुटुंबीयांकडून संचलित संथागार वृद्धाश्रमात भेट देऊन, वृद्धांसाठी एका दिवसाच्या भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली. या सेवाभावी उपक्रमातून वाढदिवस साजरा करताना सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न संदीप केंद्रे यांनी केला. या कार्यक्रमावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, विश्वास कोल्हारीकर, बंटी फड, सुनील मच्छेवार, जगदीश तिरमनवार, शंकर भंडारे, कृष्णा इटकेपेल्लीवार तसेच अरुण आळने व संथागारमधील वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित प्रत्येकाने मंत्री पंकजा मुंडे यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या.

### नांदेड जिल्ह्यास १५ मिनीमाती तपासणी प्रयोग शाळा मंजूर

**नांदेड**-राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम २०२५-२६ मध्ये नांदेड जिल्ह्यात १५ ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता मिळाली आहे. प्रयोगशाळेसाठी शेतकरी उत्पादक कंपन्या व ईच्छूकांनी ८ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे. जिल्हा कृषी विभागाने पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागवले आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजना कॅफेटेरिया अंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम सन २०२५-२६ साठी २ लाख २२ हजार मृद नमुने ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळेकडून तपासणी करण्याबाबत सन २०२५-२६ च्या राज्याच्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये मान्यता दिली आहे. सन २०२५-२६ चे राज्यस्तरीय वार्षिक कृती आराखड्यामध्ये राज्यासाठी एकूण ४४४ नवीन ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा उभारण्यासाठी मंजुरी मिळालेली आहे. कृषीसंचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषी आयुक्तालय, पुणे यांनी नांदेड जिल्ह्यात १५ ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर प्रयोगशाळा उभारण्यासाठी अर्थसाहाय्य खासगी व्यक्ती, शेतकरी उत्पादक संस्था, कृषी चिकित्सालये आणि कृषी व्यावसायिक केंद्रे, माजी सैनिक बचतगट, शेतकरी सहकारी संस्था, कृषी आवश्यक सेवा, निविष्ठा किरकोळ विक्रेते तसेच शाळा, कॉलेज, युवक-युवती यांना दिले जाणार आहे. नांदेड जिल्ह्यासाठी लाभार्थ्यांकडून अर्ज मागवले जात असून इच्छुकांनी ८ ऑगस्ट, २०२५ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावेत. ग्रामस्तरीय मृद चाचणी प्रयोगशाळेसाठी अर्थसहाय्य रक्कम १ लाख ५० हजार रुपये आहे. लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय निवड समितीकडून सोडत काढून लाभार्थ्यांची अंतिम निवड केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# डिसेंबरपर्यंत नांदेड-पुणे वंदेभारत रेल्वे सुरु होणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ जुलै -**

मराठवाड्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक दृष्टीने पुणे हे अत्यंत महत्त्वाचे शहर बनले आहे. नांदेड ते पुणे आय.टी. हब शहराला अनेक आय.टी. व्यावसायिक व शैक्षणिक विद्यार्थी दररोज ये-जा करतात.सद्यस्थितीत नांदेड ते पुणे दरम्यान दिवसभरात एकही रेल्वे गाडी उपलब्ध नाही नसल्याने प्रवाशांना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे नांदेड-पूणे-नांदेड वंदे भारत रेल्वे सेवा नांदेड, लातूर, उस्मानाबाद या मार्गाने सुरू करावी, अशी मागणी खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली असून त्यांच्या या मागणीला रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे येत्या डिसेंबरपर्यंत नांदेड-पुणे वंदेभारत रेल्वेसेवा सुरु करण्याचे संकेत रेल्वेमंत्र्यांनी दिले आहेत.

खा.रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले की, नवीन नांदेड-पूणे-नांदेड वंदे भारत रेल्वे सेवा नांदेड, लातूर, उस्मानाबाद या मार्गे सुरु केल्यास मराठवाड्यातील लाखो रेल्वे प्रवाशांना मोठा लाभ होणार आहे. हे अंतर सुमारे ५५० कि.मी. आहे.याशिवाय पणवेल-नांदेड गाडी क्र. १७६१३ या रेल्वेचा वेग वाढवण्याची आवश्यकता असून ही गाडी पणवेलहून दुपारी ४:०० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ८:४५ वाजता नांदेड स्थानकावर पोहचते, आणि ६४६ कि.मी. अंतर इलेक्ट्रिक इंजिनने पार करते. पणवेल-कुर्डूवाडी स्टेशनचे ३०३ कि.मी. अंतर ६ तास २० मिनिटांत तरकुर्डूवाडी-नांदेडचे ३७० कि.मी. अंतर १० तास २० मिनिटांत पार करते. परिणामी ही गाडी नांदेड स्थानकावर विलंबाने पोहचत आहे.या रेल्वे गाडीचा वेग वाढविणे तांत्रिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून आवश्यक आहे.

# मुदखेड येथे सीआरपीएफचा स्थापना दिन उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२९ जुलै -**

मुदखेड येथील सीआरपीएफ केंद्रात दि.२७ जुलै रोजी केंद्रीय रिझर्व्ह पोलिस फोर्स (सीआरपीएफ) मुदखेड येथे दलाचा ८७ वा स्थापना दिन मोठ्या उत्साहात आणि सन्मानाने साजरा करण्यात आला.

या प्रसंगी, महानिरीक्षक आणि महाविद्यालयाचे प्राचार्य ख्वाजा सजनुद्दीन यांनी सर्व अधिकारी, अधीनस्थ अधिकारी, जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन केले. आपल्या भाषणात त्यांनी दलाच्या गौरवशाली इतिहासावर प्रकाश टाकला आणि सांगितले की सीआरपीएफची स्थापना २७ जुलै १९३९ रोजी नीमच (मध्य प्रदेश) येथे क्राऊन रिप्रेझेंटेटिव्हज पोलिस म्हणून झाली.



स्वातंत्र्यानंतर, त्याची पुनर्रचना केंद्रीय राखीव पोलिस दल म्हणून करण्यात आली आणि तेव्हापासून दरवर्षी दि.२७ जुलै हा दिवस स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो.

या प्रसंगी, महानिरीक्षकांनी शहीद सैनिकांना श्रद्धांजली वाहिली. क्वार्टर गार्डमध्ये त्यांना मानवंदना देण्यात आली आणि विशेष सैनिक संमेलनाला संबोधित करताना त्यांनी देशसेवेतील सैन्याच्या शिस्त, वचनबद्धता आणि योगदानाचे कौतुक केले.

स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात मुदखेड शहरात भव्य सायकल रॅली, सामूहिक वृक्षारोपण आणि केंद्रीय विद्यालयातील मुलांसह संस्थेच्या कॅम्पसमधील मुलांसाठी विविध श्रेणींमध्ये चित्रकला स्पर्धा यांचा समावेश होता. यासोबतच प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थींमध्ये उत्साहाने क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या विशेष दिवसानिमित्त, सर्वांना एकता आणि उत्सवाचा अनुभव देण्यासाठी संस्थेच्या सर्व कॅंटीनमध्ये 'बडा खाना' या विशेष सामूहिक मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते.

कमांडंट कम चीफ ट्रेनिंग ऑफिसर वेद प्रकाश त्रिपाठी, डेप्युटी कमांडंट अरुण कुमार आणि मोहम्मद शाहनेवाज, असिस्टंट कमांडंट करणजीत सिंग आणि वासुदेव, वैद्यकीय अधिकारी डॉ. नीलेश कुमार आणि संस्थेचे सर्व अधीनस्थ अधिकारी, सैनिक, प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी या प्रतिष्ठित कार्यक्रमात उपस्थित होते.

# सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२९ जुलै -**

सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार ४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे.

या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल.

# माहूर पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड; ९ जण ताब्यात



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.२९ जुलै -**

पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी शहरातील बौद्ध पुरा परिसरात घरासमोरील अंगणात सार्वजनिक ठिकाणी जुगार अड्ड्यावर धाड टाकून विनापरवाना झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवीत असलेल्या नऊ जणांना ताब्यात घेत त्यांचेकडून १५ हजार ६३० रुपयांची नगदी रोकड व जुगार साहित्यासह मुद्देमाल जप्त केल्याची खळबळजनक कारवाईची घटना दि.२८ रोजी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास घडली आहे.

पोलीस निरीक्षक गणेश कराड हे अल्पावधीतच जनतेच्या दृष्टीकोनातून एक सिंघम पोलिस अधिकारी ठरले असून,सध्या करत असलेल्या एकामागून एक अशा धाडसी कारवायांमुळे ते कमालीचे ॲक्टिव्ह ॲन्ड ॲक्शन मोडवर असल्याचे दिसून येत आहेत. शहरातील वार्ड क्रमांक १३ मधील बौद्धपुरा परिसरात घरासमोरील अंगणात सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना स्थानिकचे ९ आरोपीतांना नगदी १५ हजार ६३० रुपये व जुगाराचे साहित्यासह रंगेहाथ पकडले. या ९ आरोपीतांना ताब्यात घेत माहूर पोलिसांनी त्यांचे विरुद्ध गुन्हा कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे पोलिस कॉन्स्टेबल गजानन देविदास जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या आदेशाने गुन्हा नोंद केला असून, सर्व आरोपींना पोलिसांकडून नोटीस देण्यात आली आहे. या छापा कारवाईचा पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल गजानन चौधरी यांच्या कडे देण्यात आला आहे.

या कारवाईत पोलीस निरीक्षक गणेश कराड, सपोनि पालसिंग ब्राह्मण, सपोनि संदीप अन्येबोईनवाड, पोहेका गजानन चौधरी, पोहेका प्रकाश गेडाम, पोहेका कैलास जाधव, पवन राऊत, ज्ञानेश्वर खंदाडे, चालक जाधव यांनी कामगिरी बजावली.

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी माहूर ठाण्यात रुजू होताच १४ जून पासून आजपर्यंत अल्पावधीतच अवैध देशी दारू विक्री, अवैध हातभट्टी दारु विक्री, अवैध वाळू चोरी यासह अवैध विनापरवाना मटका जुगार अड्ड्यावर छापे अशा जबरदस्त कारवाया करत आरोपींवर गुन्हे दाखल करत मोठ्या प्रमाणात नगदी रक्कमेसह विविध मुद्देमाल जप्त केला असुन शहरासह परिसरात सुरू असलेल्या अवैध गुटखा साठवणूक स्थळे व विक्रीवर देखील त्यांच्याकडून अशाच प्रकारच्या धडाकेबाज कारवाईची अपेक्षा पोलिस प्रशासनावर विश्वास असलेल्या कायदाप्रेमीनागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

# तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची ३ ऑगस्ट रोजी शेगाव येथे राज्यस्तरीय बैठक

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२९ जुलै -**

महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची राज्यस्तरीय बैठक रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी हॉटेल साई गजानन सभागृह, अकोला रोड, श्री क्षेत्र शेगाव येथे राज्याध्यक्ष नितीन धामणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस राज्यसचिव हरिश्चंद्र काळे (अहिल्यानगर)राज्यकार्याध्यक्ष मधुकर मुंगल (नांदेड )राज्य कोषाध्यक्ष महेंद्र निकम (छ. संभाजीनगर)राज्य उपाध्यक्ष नारायण पवार (सातारा) संजय बाविस्कर (नाशिक) स्नेहल नरळे पाटील (सातारा) आरती पाटील (नंदुरबार) उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी राज्य कार्यकारिणी पदाधिकारी, विभागीय अध्यक्ष व पदाधिकारी, राज्यातील जिल्हाध्यक्ष, जिल्हासचिव, पदाधिकारी सक्रिय सभासद बांधव चर्चेत सहभाग घेणार आहेत.

या बैठकीत ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाकरिता संघटनेमार्फत मंत्रालयीन स्तरावर केलेल्या कामकाजाची माहिती देणे, संघटनेच्या नावात बदल व घटनादुरुस्ती प्रस्तावावर चर्चा करून सभेची मान्यता घेणे दि. २४ सप्टेंबर २०२४ व २ जून २०२५ च्या ग्रामविकास विभागाकडील निर्गमित शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे, संवर्गावरील अतिरिक्त कामाचा ताण कमी करणे, संघटनेच्या राज्य, विभाग, जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेणे, संघटनेच्या कामकाजाने प्रभावित होऊन इच्छुक असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी यांना संघटनेचे सभासदत्व बहाल करून संघटनेची व्याप्ती वाढविणे, संघटनेच्या सभासदांची नोंदणी फी व मासिक वर्गणी बाबत आढावा घेऊन पुढील ध्येय धोरण ठरविणे, हंगामी गठीत जिल्हा कार्यकारिणी यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन मान्यता देणे व नियमित करणे, सभासदांच्या अडीअडचणी बाबत चर्चा करणे, अजेंड्यावरील विषयावर चर्चा होऊन ठराव पारित होणार आहेत. या बैठकीचे नियोजन वाशिम व अकोला जिल्ह्यातील पदाधिकारी यांनी केले आहे सदर बैठकीस विदर्भातील सर्व जिल्ह्यासह उर्वरित महाराष्ट्रातील सक्रिय सभासद बांधवांनी व सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन नांदेड जिल्हाध्यक्ष गुलाब वडजे व जिल्हा सचिव संजय देशमूख सह कार्याध्यक्ष संदिप कच्छवे यांनी केले आहे.

# आ. बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त कीर्तनासह अन्य सामाजिक उपक्रमाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२९ जुलै -**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे शेतकरीपुत्र आ. आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार दिनांक १ ऑगस्ट रोजी हरिभक्त पारायण रामरावजी महाराज ढोक यांच्या भव्य कीर्तन सोहळ्यासह अनेक सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नांदेड दक्षिण शिवसेनेच्या वतीने आज आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

आ.बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त २ ऑगस्ट रोजी सकाळी १:३० वाजता मातोश्री मंगल कार्यालय कौठा नांदेड येथे ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होईल . त्यानंतर याच ठिकाणी आरोग्य शिबिराचे ही आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना शहरप्रमुख सिडको-हडको सुहास खराणे पाटील यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना १००१ परीक्षा पॅडचे वाटप करण्यात येणार आहे. दुपारी बारा वाजता आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमालाही आ.बोंढारकर यांची उपस्थिती असणार आहे. युवासेना जिल्हाप्रमुख स. आमोदसिंघ साबळे यांच्यावतीने २१०० वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. याचवेळी युवासेनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आलेले आहे. तालुकाप्रमुख अशोक मोरे यांच्या वतीने सोनखेड सर्कल मधील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे.



दरम्यान मातोश्री मंगल कार्यालय येथे पार पडणाऱ्या मुख्य अभिष्टचिंतन सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून शिवसेनेचे उपनेते तथा मंत्री विधानपरिषदेचे गटनेते नामदार हेमंतभाऊ पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण हे उपस्थित राहणार असून यावेळी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास खा. डॉ .अजित गोपछडे , शिवसेना उपनेते आनंदराव जाधव ,आमदार बालाजीराव कल्याणकर ,हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर , गोदावरी समूहाचे अध्यक्ष राजश्रीताई हेमंत पाटील , भाजपा मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे , विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप , कुलगुरू मोहन चासकर ,जिल्हाधिकारी राहुल कर्डिले , मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली , पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, आयुक्त महेशकुमार डोईफोडे , आरटीओ विनय अहिरे ,राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक गणेश पाटील , जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंबरे , सहाय्यक आयुक्त शिवानंद मीनगिरे , अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव , निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर , उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ ,सौ. अरुणा संगेवार , तहसीलदार संजय वारकड , लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर , उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक , समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आवुलवार , यांच्यासह अनेक आजी-माजी आमदार, लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.